# ४. कळते कसे?

- प्रस्तावना
- भारतीय ज्ञानमीमांसा
- पाश्चात्त्य ज्ञानमीमांसा
- वैज्ञानिक दृष्टिकोन

## प्रस्तावना

प्राचीन काळापासून माणूस ज्ञान मिळवण्यासाठी धडपडत राहिला आहे. गेल्या काही हजार वर्षांमध्ये मनुष्यजातीने प्रचंड प्रमाणात ज्ञान संपादन केले आहे. तरीही माणसाची ज्ञान मिळवण्याची भूक मिटण्याची काही चिन्हे नाहीत. खरेतर काही ना काही प्रकारचे ज्ञान मिळवण्याचे सामर्थ्य सगळ्याच सजीवांना असते. त्यांच्या जगण्यासाठी ते गरजेचेच असते. पण प्रत्येक मानवेतर जीवजात जे ज्ञान मिळवते त्यात मोठे गुणात्मक बदल होताना दिसत नाहीत, तसेच त्यात वृद्धिही होताना दिसत नाही. मनुष्यजातीचे ज्ञान मात्र काळाबरोबर अधिकाधिक सखोल, विस्तृत, सूक्ष्म होत जाते. त्यात सतत नवीन भर पडत राहते.

आपण आतापर्यंत पाहत आलो त्याप्रमाणे माणसाला असणारी जाणीवेची जाणीव त्याला इतर सजीवांपेक्षा वेगळा ठरवणारा मुख्य घटक आहे. या द्विस्तरीय जाणीवेमुळेच माणसाला इतर सजीवांप्रमाणे ज्ञान तर असतेच, पण त्याचबरोबर ज्ञान असण्याची जाणीवही असते. त्यामुळे 'ज्ञान' ही संकल्पनाच त्याच्या ज्ञानाचा विषय होऊ शकते. आपले भक्ष्य कुठे मिळेल? आपल्याला धोका कुठे आहे? याचे उपजत आणि अनुभवातून येणारे ज्ञान कुत्र्या-मांजरांसारख्या पाळीव प्राण्यांत असते याचा अनुभव आपण घेतोच. पण "मला हे ज्ञान कसे बरे होते? हे ज्ञान अचूक होण्यासाठी काय करायला हवे"? असे प्रश्न पडतात का कधी त्यांना? तसे जाणवत तरी नाही. पण माणसाला मात्र हे आणि असे प्रश्न गेली शेकडो वर्षे पडत आले आहेत.

आपण मागच्या वर्षी अभ्यासल्याप्रमाणे तत्त्वज्ञानाची ज्ञानमीमांसा ही शाखा ज्ञानासंबंधीच्या अशा अनेक प्रश्नांचा सविस्तर, चिकित्सक ऊहापोह करते. ज्ञान म्हणजे काय? ज्ञान आणि त्याच्याशी संबंधित अशा; मत, समजूत, विश्वास, माहिती इत्यादी संकल्पनांमध्ये नक्की काय फरक आहे? ज्ञान मिळवण्याची साधने किंवा प्रमाणे कोणती? ज्ञानाचे समर्थन कसे करायचे? सत्य म्हणजे काय? अशा अनेक प्रश्नांचा जो विचार भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरांमध्ये केला गेला आहे, त्याचा परिचय या पाठात काही प्रमुख संकल्पनांच्या संदर्भात करून घेऊया.

## भारतीय ज्ञानमीमांसा

रोजच्या जीवनात आपण 'ज्ञान' हा शब्द खूप काटेकोरपणे वापरत नाही. आपली मते, धारणा, समजुती यांनाही आपण 'ज्ञान' ही संज्ञा वापरतो. जे आपल्या ओळखीचे, परिचयाचे आहे, जे आपल्याला समजले आहे असे आपल्याला वाटते, त्यासाठीही आपण ज्ञान हाच शब्द वापरतो. पण तात्त्विक दृष्टिने बघता हा वापर प्रत्येक वेळी योग्य ठरत नाही. याचे महत्त्वाचे कारण असे, की आपल्याला ज्ञान आहे असे वाटणे आणि खरोखरच ज्ञान असणे यांत फरक आहे. आपल्याला जे 'वाटते', 'समजते' ते खरे असतेच असे नाही. ते जर खरे नसेल, तर त्याला ज्ञान म्हणणे चुकीचे ठरेल. तत्त्वज्ञानाला सत्याच्या कसोटीला जे ज्ञान उतरते, त्या ज्ञानामध्ये रस असतो. त्या प्रकारच्या ज्ञानाची साधने, प्रकार जाणून घेण्यात रस असतो.

सत्याच्या कसोटीला उतरणाऱ्या अशा ज्ञानाला भारतीय तत्त्वज्ञानात 'प्रमा' ही संज्ञा वापरली जाते. 'ज्ञान' हा शब्द आपण जे काही ग्रहण करतो, आत्मसात करतो, त्याच्यासाठी उपयोगात आणला जातो. इंद्रियानुभव, बुद्धि, स्मृती, शब्द अशा अनेक मार्गांनी आपण जगाला जाणून घेत असतो. पण प्रत्येक वेळी आपल्याला जग जसे जाणवते, दिसते, कळते तसेच ते असते असे नाही.

**चला बोलूया!**

ज्ञानाच्या विविध उदाहरणांची यादी तयार करा. त्यांतून कोणती उदाहरणे सत्य ज्ञानाची अर्थात प्रमेची आहेत हे नक्की करा. या विविध उदाहरणांची गटांत चर्चा करा.

गेल्या वर्षी “दिसते तसे नसते” हे आपण शिकलेलेच आहोत. पण जे काही कळले आहे; ते खरे की खोटे, सत्य की असत्य याची पडताळणी, तपासणी केलेली नसली, तरी भारतीय परंपरेत त्याला ‘ज्ञान’ म्हटले जाते. अशा तपासणीनंतर ज्याची सत्यता प्रस्थापित होते, त्याला ‘प्रमा’ म्हणतात. एखादी वस्तू जशी आहे तशी कळणे, त्या आकलनात कुठल्याही चुका नसणे म्हणजे त्या वस्तूची ‘प्रमा’ असणे. ज्या व्यक्तीला ‘प्रमा’ प्राप्त होते किंवा जी व्यक्ती ‘प्रमा’ प्राप्त करून घेते, त्या व्यक्तीला ‘प्रमाता’ म्हणतात. ज्या साधनांनी ‘प्रमे’ची प्राप्ती होते, त्यांना ‘प्रमाण’ म्हटले जाते. ज्याचे ज्ञान होते त्याला ‘प्रमेय’ म्हणतात.

मनुष्येतर सजीव आणि मनुष्य यांमधील फरकांची जी चर्चा आपण सुरुवातीला केली, तिच्या आधारे असे म्हणता येईल, की मनुष्याखेरीज इतर सर्वच सजीवांना ‘ज्ञान’ होते, कारण त्यांना इंद्रियसंवेदन होते. पण मिळालेले ज्ञान चूक की बरोबर, सत्य की असत्य याचे मूल्यमापन केवळ मनुष्यालाच करता येते. म्हणजेच ‘प्रमे’ची प्राप्ती फक्त मनुष्यालाच होते. मर्यादित अर्थाने सर्वच सजीवांना ‘ज्ञाता’ म्हणता येईल, पण केवळ मनुष्यालाच ‘प्रमाता’ असे संबोधता येऊ शकते. मनुष्याला असणाऱ्या जैविक, बौद्धिक, भाषिक क्षमतांमुळे त्याला इंद्रियसंवेदन, तर्क, शब्द अशा विविध ज्ञानसाधनांद्वारे किंवा प्रमाणांद्वारे ‘प्रमे’ची प्राप्ती करून घेता येते.

## प्रमाणविचार

भारतीय परंपरेत प्रमाणविचार ज्ञानमीमांसेच्या केंद्रस्थानी आहे. योग्य ती ज्ञानसाधने वापरल्याशिवाय ‘प्रमे’ची प्राप्ती हे साध्य गाठता येणे शक्य नाही. त्यामुळे ज्यामधून ‘प्रमे’ची निष्पत्ती होते, अशी साधने कोणती आहेत? अशी साधने किती आहेत? त्यांचे स्वरूप काय असते? त्यांचा परस्परांशी काय संबंध असतो याचे सखोल चिंतन भारतीय दर्शनांमध्ये आढळते.

‘प्रमाण’ ही संकल्पना वाटते त्यापेक्षा अधिक सखोल आहे. ‘प्रमे’चे साधन म्हणजे ‘प्रमाण’ हा या संकल्पनेचा केवळ एक अर्थ आहे. त्याव्यतिरिक्त तिचे आणखी किमान दोन अर्थ आहेत. त्यातील एका अर्थानुसार प्रमाण म्हणजे ‘प्रमे’चा प्रकार. बौद्ध आणि जैन दर्शनांनी ‘प्रमाण’ या संकल्पनेचा हा अर्थ स्वीकारला आहे. त्यांच्या मते आपल्या ज्ञानाच्या प्रक्रियेत, साधन आणि त्याचे फल असा फरक करता येत नाही. त्यापेक्षा आपल्याला जे ज्ञान मिळते त्याचे, त्याच्या वेगवेगळ्या स्वरूपांनुसार वर्गीकरण केल्यास ज्ञान म्हणजे काय ते अधिक सुस्पष्टपणे समजेल. या वर्गीकरणातून ज्ञानाचे अथवा ‘प्रमे’चे जे प्रकार प्राप्त होतात तीच प्रमाणे. प्रत्यक्ष, अनुमान, शब्द इत्यादी जी प्रमाणे भारतीय परंपरेने स्वीकारली आहेत, ती केवळ ‘प्रमे’ची साधनेच नव्हेत, तर ‘प्रमे’चे प्रकार आहेत असे मानण्याकडे जैन आणि बौद्ध दार्शनिकांचा कल आहे.

‘प्रमाण’ या संकल्पनेचा तिसरा अर्थ म्हणजे पुरावा, समर्थन किंवा ज्ञानाच्या अधिकृतपणाची हमी. आपल्या नेहमीच्या बोलण्यातही ‘तुम्ही म्हणता त्याला प्रमाण काय’? असा प्रश्न विचारला जातो त्या वेळी आपण त्या गोष्टीचा पुरावा काय? जे म्हटले आहे ते खरे कशावरून? हे जाणून घ्यायचा प्रयत्न करत असतो. ‘प्रमाण’ संकल्पनेचा हा मूलभूत अर्थ वरील दोन्ही अर्थांशी संबंधित आहे. ‘प्रमाण’ म्हणजे ‘प्रमेचे’ साधन असे आपण जेव्हा म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ ज्याच्या साहाय्याने ‘प्रमा’ प्राप्त होते, असे खात्रीशीर किंवा अधिकृत साधन असा असतो. ‘प्रमाण’ म्हणजे ‘प्रमे’चा प्रकार असे आपण म्हणतो, तेव्हा त्याचा अर्थ पुरावाप्राप्त किंवा खात्रीशीर ज्ञानाचा प्रकार असा असतो.

**चला करूया!**

‘प्रमाण’ चे विविध अर्थ स्पष्ट करणारे संकल्पनाचित्र तयार करा.

## न्याय दर्शनातील प्रमाणविचार


भारतीय प्रमाणविचारात न्याय दर्शनाचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. ज्ञान, प्रमा, अप्रमा, प्रमाणे इत्यादी मूलभूत संकल्पनांची सर्वप्रथम सुव्यवस्थित मांडणी करण्याचे काम न्याय दार्शनिकांनी केले. त्यांचा प्रमाणविचार थोडक्यात समजावून घेऊया.

न्याय मतानुसार दिव्याचा प्रकाश ज्याप्रमाणे वस्तूंना उजेडात आणतो, त्याप्रमाणे ज्ञान, ज्ञानविषयांना प्रकाशात आणते. ढोबळमानाने ज्ञानाचे वर्गीकरण अनुभव आणि

स्मृती या दोन प्रकारांमध्ये केले जाते. अनुभवात वस्तूची साक्षात जाणीव किंवा बोधन होत असते, तर स्मृतीने होणारे बोधन हे अनुभवाची आठवण या प्रकारचे असते. या दोन्ही ज्ञान प्रकारांचे वर्गीकरण पुन्हा यथार्थ आणि अयथार्थ या उपप्रकारांत केले जाते. ज्या ज्ञानामध्ये वस्तू आहे तशीच कळते, त्या ज्ञानाला यथार्थ ज्ञान असे म्हणतात. ज्या ज्ञानामध्ये वस्तू जशी आहे तशी कळत नाही, त्याला अयथार्थ ज्ञान म्हणतात. यथार्थ अनुभव म्हणजे प्रमा. अयथार्थ अनुभव म्हणजे अप्रमा. न्याय दर्शनानुसार प्रत्यक्ष, अनुमान, उपमान आणि शब्द या चार साधनांच्याद्वारे प्रमेची प्राप्ती होते. या प्रमाणांची ओळख आता करून घेऊ.

**प्रत्यक्ष**

प्रत्यक्ष याचा अर्थ आपल्याला ज्ञानेंद्रियांमार्फत होणारे संवेदनज्ञान. डोळे, कान, नाक, जीभ व त्वचा ही पाच ज्ञानेंद्रिये व मन यांना अनुक्रमे रंग, शब्द, गंध, रस, स्पर्श व आनंद-दुःख या भावना यांचे जे संवेदन होते त्याला प्रत्यक्ष असे म्हणतात. सर्व प्रमाणांमधील, हे सर्वांनी स्वीकारलेले, प्राथमिक महत्त्वाचे प्रमाण होय. न्याय दर्शनातील एका व्याख्येनुसार ज्ञानेंद्रिय आणि विषय यांच्या संपर्कामधून होणारे निश्चित, दोषमुक्त आणि सत्य ज्ञान म्हणजे प्रत्यक्षज्ञान. न्याय दर्शन असे मानते, की माणसाचा आत्मा हा ज्ञाता असतो. विषय-ज्ञानेंद्रिये-मन अशा संपर्क साखळीने हे ज्ञान आत्म्याला होते.



दृश्य वस्तू, तसेच त्या वस्तूचे गुणधर्म – रंग, रूप, पोत, चव, वास इत्यादींचे संवेदन आपल्याला विशिष्ट ज्ञानेंद्रियांद्वारे होते. एखाद्या विषयाचे प्रत्यक्षज्ञान होण्यासाठी त्याकडे आपले अवधान असणे, भान किंवा लक्ष असणे आवश्यक असते. समजा, आपण एकाग्र मनाने अभ्यास करत असलो तर त्या वेळी आपल्या कानावर आवाज पडत असतात, पण त्यांचे प्रत्यक्ष ज्ञान आपल्याला होत नाही. कारण आपले अवधान तिकडे नसते. म्हणजेच आवाज आणि कान यांचा संबंध येतो, पण 'मन' दुसरीकडे असते. ते 'कान' या इंद्रियाशी खऱ्या अर्थाने जोडलेले नसते. अशा रीतीने विशिष्ट विषयासंबंधी अवधान किंवा भान असणे हे मनाचे कार्य आहे. इंद्रियसंवेदनांमार्फत असे ज्ञान होणे ही आपल्या अनुभवाची गोष्ट आहे.

**चला करूया!**

'पुस्तक' या वस्तुसाठीची ज्ञानसंपर्क साखळी गटामध्ये तयार करा.

न्याय दर्शनाने या प्रत्यक्ष प्रमाणाचे सखोल विवेचन करताना त्याचे व्यवस्थित वर्गीकरण केले आहे. प्रत्यक्षाचे मुख्य वर्गीकरण लौकिक म्हणजे सर्वसाधारण आणि अलौकिक म्हणजे असाधारण या दोन प्रकारांमध्ये केलेले आहे. आपली पाच ज्ञानेंद्रिये आणि मन यांच्या कक्षेत येणाऱ्या सर्व वस्तूंचे ज्ञान लौकिक प्रत्यक्षात मोडते. ज्ञानेंद्रियांच्या साक्षात अनुभवाला येऊ न शकणाऱ्या विषयाचे ज्ञान सर्वसाधारण मार्गाने न होता, असाधारण मार्गाने होते, म्हणून त्याला अलौकिक प्रत्यक्ष म्हटले जाते. लौकिक प्रत्यक्षाचे वर्गीकरण बाह्य प्रत्यक्ष आणि आंतर/मानस प्रत्यक्ष यांमध्ये केले जाते. डोळे, नाक, कान, त्वचा, जीभ या बाह्य ज्ञानेंद्रियांकडून होणारे ज्ञान म्हणजे बाह्य प्रत्यक्ष; तर मनाद्वारे होणारे ज्ञान म्हणजे मानस प्रत्यक्ष. मन हे न्याय मतानुसार आंतरइंद्रिय आहे. सुख-दुःख, इच्छा-द्वेष इत्यादींचे ज्ञान या आंतरेंद्रियांद्वारे किंवा अंतःकरणाद्वारे होते.

अलौकिक प्रत्यक्षाचे सामान्यलक्षण प्रत्यासत्ती, ज्ञानलक्षण प्रत्यासत्ती आणि योगजलक्षण प्रत्यासत्ती असे तीन प्रकार होतात. एखाद्या विशिष्ट प्रकारातील अनेक वस्तूंमध्ये जो समान गुणधर्म असतो, त्याला सामान्य असे म्हटले जाते. न्याय दर्शन असे मानते, की जेव्हा आपण एखाद्या फुलाचा अनुभव घेतो, तेव्हा आपल्याला फक्त त्या विशिष्ट फुलाचेच नाही तर 'फूलपणाचे', 'पुष्पत्व' या सामान्याचे ज्ञान होते. तसेच या सामान्याच्याद्वारा एकंदरीत 'फूल' असणे म्हणजे काय ते कळले, असे सगळ्या फुलांचे सामान्यरूपाने

ज्ञान होते. हे ज्ञान सामान्यलक्षण प्रत्यासत्तीने झाले असे न्याय दर्शन मानते. त्याचप्रमाणे गाभुळलेल्या चिंचा पाहून त्या आंबटगोड आहेत हे आपल्याला त्यांची चव न घेताच समजते. आपल्या डोळ्यांना तर चवीचे ज्ञान नसते, तरीही ते ज्ञान आपल्याला होते ते ज्ञानलक्षण प्रत्यासत्तीमुळे. तसेच एखाद्या योग्याला भूतकाळाचे, भविष्यकाळाचे ज्ञान असते असे जे समजले जाते, ते ज्ञानही ज्ञानेंद्रियांद्वारे होणे शक्य नसते. हे ज्ञान योग्याला योगजलक्षण प्रत्यासत्तीने होते असे म्हटले जाते.

**चला करूया!**

अलौकिक प्रत्यक्षाच्या प्रकारांची उदाहरणे मिळवा. गटांमध्ये त्यावर भित्तिपत्रके तयार करा.

## अनुमान

आपल्याला असलेल्या ज्ञानाचा मोठा भाग प्रत्यक्ष प्रमाणामधून मिळवलेल्या ज्ञानाचा असतो हे खरे असले, तरी सगळेच ज्ञान त्यामधून मिळत नाही हेही तितकेच खरे आहे. म्हणूनच इतर ज्ञानसाधनांची आवश्यकता भासते. यांतील एक महत्त्वाचे साधन म्हणजे तर्कबुद्धी. तर्कबुद्धीचा उपयोग करून, ज्ञानेंद्रियांच्या प्रत्यक्ष अनुभवाला न येणाऱ्या अनेक गोष्टींचे ज्ञान आपण रोजच्या जीवनापासून विज्ञानापर्यंतच्या ज्ञानाच्या सर्व क्षेत्रांत मिळवत असतो. एखाद्या बंद सभागृहात असताना दार थोडे उघडले गेल्यावर आत येणाऱ्या हवेतला मृद्गंध आपल्या नाकाला जाणवतो आणि प्रत्यक्ष न बघताही आपण शेजारच्या व्यक्तीला सांगतो, 'पाऊस आला'. लोखंडाचे कण एखाद्या वस्तूकडे आकर्षित झाले तर आपण असा निष्कर्ष काढतो, की त्या वस्तूमध्ये चुंबकशक्ती आहे. जे प्रत्यक्ष अनुभवाला येते त्याच्या आधारे जे साक्षात अनुभवाला येत नाही त्याबद्दल तर्काने निष्कर्ष काढणे म्हणजे अनुमान.

'अनुमान' या पदाचा शब्दशः अर्थ आहे, "एखाद्या ज्ञानानंतर येणारे वेगळे ज्ञान". आपल्याला जे अनुभवाला येते ते, जे अनुभवाला येत नाही त्याचे लिंग म्हणजे खूण असते. रानवाटांनी जाताना मातीवर जे पायांचे ठसे दिसतात, ते कुठला प्राणी तिथे येऊन गेला आहे, याची खूण असते. न्याय दर्शनातील सुप्रसिद्ध उदाहरण म्हणजे, जेव्हा आपल्याला डोंगरावरून धूर येताना दिसतो, तेव्हा धूर ही अग्नीची खूण असल्यामुळे आपण "डोंगरावर कुठेतरी आग लागली आहे", असे अनुमान काढतो. थोडक्यात, ज्ञात गोष्टीच्या आधारावर होणारे अज्ञाताचे ज्ञान म्हणजे अनुमान असे म्हणता येते.

अनुमान प्रक्रियेत पक्ष, हेतू आणि साध्य असे तीन घटक असतात. ज्याबद्दल आपण तर्क किंवा अनुमान करतो, त्याला 'साध्य' असे म्हणतात. ज्या ठिकाणी किंवा जिथे साध्य आहे असा निष्कर्ष आपण काढतो त्याला 'पक्ष' म्हटले जाते. ज्याच्या आधारे आपण साध्य सिद्ध करतो, त्याला 'हेतू' असे म्हणतात. हेतू हा पक्ष आणि साध्य यांना जोडणारा दुवा असतो. वरील उदाहरणामध्ये डोंगर हा पक्ष आहे, जिथे धूर म्हणजे हेतू आहे. या हेतूवरून किंवा पुराव्यावरून आपण तिथे आग आहे हे सिद्ध करतो. 'अग्नी' हे या उदाहरणातील साध्य आहे.

हेतू पक्षावर असणे याला 'पक्षधर्मता' म्हणतात. हेतू आणि साध्य यांमध्ये जो एकत्र असण्याचा म्हणजे साहचर्य संबंध असतो, त्याला 'व्याप्ती' म्हणतात. हेतू नेहमीच साध्याबरोबर नसेल, तर हेतूच्या अस्तित्वावरून, साध्याच्या अस्तित्वासंबंधी आपण अनुमान करू शकणार नाही. धूर अग्नीपासून उत्पन्न होतो. अग्नीखेरीज धुराचे अस्तित्व शक्य नसते. धूर आणि अग्नी यांमध्ये व्याप्तीसंबंध असतो. "जेथे जेथे धूर आहे, तेथे तेथे अग्नी आहे". (यत्र यत्र धूमः, तत्र तत्र वन्हिः।) हे वाक्य, हा व्याप्तीसंबंध सूचित करणारा आहे.

**चला विचार करूया!**

अनुमानाची उदाहरणे शोधून, त्या उदाहरणातील पक्ष, हेतू, साध्य कोणते हे स्पष्ट करा.

अनुमान प्रक्रियेचा तुम्ही बारकाईने विचार केलात, तर तुमच्या हे लक्षात येईल, की ही प्रक्रिया गुंतागुंतीची आहे. तिची सुरुवात पक्षावर हेतू आहे असे ज्ञान प्रत्यक्ष प्रमाणामधून मिळण्याने होते. नंतर हेतू आणि साध्य यांच्यातील पूर्वी अनुभवलेला किंवा माहिती असलेला जो व्याप्तीसंबंध असतो, त्याचे स्मरण होते. प्रत्यक्ष

अनुभवलेली पक्षधर्मता आणि हेतू व साध्यातील व्याप्तीची स्मृती यांच्या आधारे साध्याचे अनुमान केले जाते.

न्याय दर्शनातील अनुमानविचार अत्यंत व्यापक व सखोल आहे. त्यांपैकी एक महत्त्वाचा, लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे, नैय्यायिकांनी अनुमानाकडे प्रमेचे साधन आणि युक्तिवाद अशा दोन्ही दृष्टिंनी पाहिले. व्यक्तीला स्वतःला जेव्हा अनुमानाच्या साहाय्याने प्रमेची प्राप्ती होते, तेव्हा त्या अनुमानाला 'स्वार्थानुमान' म्हणतात. इथे अनुमान हे अर्थातच प्रमेचे साधन असते. आपण जो निष्कर्ष काढला आहे, तो दुसऱ्या व्यक्तीला सिद्ध करून दाखवण्यासाठी युक्तिवाद म्हणूनही अनुमानाचा वापर आपण करतो. अशा अनुमानाला 'परार्थानुमान' म्हटले जाते.

**परार्थानुमान** : न्याय दर्शनाने परार्थानुमान सांगताना, त्याच्या पाच घटकांची सुव्यवस्थित मांडणी केली आहे. प्रतिज्ञा, हेतू, उदाहरण, उपनय आणि निगमन हे ते पाच घटक आहेत. 'पर्वतावर अग्नी आहे' हे सिद्ध करण्यासाठी परार्थानुमान खालीलप्रमाणे उपयोगात आणले जाते.

(१) प्रतिज्ञा : पर्वतावर अग्नी आहे.

(२) हेतू : कारण पर्वतावर धूर आहे.

(३) उदाहरण : जेथे जेथे धूर असतो, तेथे तेथे अग्नी असतो. जसा, स्वयंपाकघरात.

(४) उपनय : पर्वतावर धूर आहे.

(५) निगमन : म्हणून पर्वतावर अग्नी आहे.

## उपमान

उपमान प्रमाण म्हणजे साधर्म्याच्या साहाय्याने होणारे ज्ञान. आपल्याला आधीपासून माहिती असलेल्या वस्तूशी असणाऱ्या साम्याच्या आधारे जेव्हा आपण एखाद्या नवीन वस्तूचे ज्ञान मिळवतो, तेव्हा आपण उपमान प्रमाण वापरत असतो. यामध्ये दोन वस्तूंमध्ये किती बाबतीत साम्य आहे यापेक्षा असलेले साम्य महत्त्वाच्या बाबतीत आहे का याला महत्त्व असते.

'उपमिती' म्हणजे उपमान प्रमाण वापरून होणारे ज्ञान हे तुलनेवर आधारित असते. न्याय दर्शनाने केलेल्या मांडणीनुसार, उपमिती म्हणजे शब्द आणि त्याने निर्देशित केलेली वस्तू यांच्या संबंधाचे ज्ञान. मागच्या वर्षीच्या पुस्तकातील 'शेकरू' या प्राण्याचे वर्णन तुम्हांला आठवते का? "शेकरू एखाद्या खारीप्रमाणे दिसणारा, पण खारीपेक्षा मोठा प्राणी आहे". हे वर्णन ठाऊक असणारी व्यक्ती, पहिल्यांदाच जेव्हा शेकरू बघेल, तेव्हा "समोरचा प्राणी शेकरू आहे" हे ज्ञान त्या व्यक्तीला होईल. 'शेकरू' या शब्दाचे जाणकार व्यक्तीने केलेले वर्णन, दिसणारा प्राणी, त्या वर्णनाचे स्मरण आणि त्याआधारे केलेली तुलना या सर्वांच्या संयोगाने "हा प्राणी शेकरू आहे" असे ज्ञान त्या व्यक्तीला मिळेल. हे ज्ञान केवळ प्रत्यक्षामधून किंवा निव्वळ स्मृतीच्या आधारे होऊ शकत नाही. 'उपमान' हे स्वतंत्र प्रमाण आहे असे नैय्यायिक मानतात.



**चला लिहूया!**

'शेकरू' प्रमाणे उपमान प्रमाणाची विविध उदाहरणे मिळवा व गटांत त्यांचे वर्गीकरण लिहा.

## शब्द

बोलताना, लिहिताना आपण सतत शब्द वापरत असतो. पण 'शब्द' म्हणजे नक्की काय याचा कधी विचार केला आहे का तुम्ही? अक्षरांपासून शब्द तयार होतो हे आपल्याला सगळ्यांना माहिती आहे. पण शब्द म्हणजे फक्त अक्षरांचा समूह असतो का? शब्द उच्चारल्यावर कानांवर पडणारे ध्वनी किंवा शब्द वाचताना कागदावर उमटलेल्या आकृत्या म्हणजेच शब्द का? अर्थातच नाही. आपल्याशी एखादी व्यक्ती अपरिचित भाषेत बोलू लागली, तर कानांवर शब्द तर पडतात, पण 'शब्दही कळत नाही' असे आपण म्हणतो. तुम्ही चिनी भाषेची चित्रलिपी 'पाहिली' असेल, पण 'वाचता' येते का? नाही ना? कारण निव्वळ ध्वनी किंवा चिन्ह म्हणजे शब्द नाही. शब्द हा भाषेचा एक असा महत्त्वपूर्ण घटक आहे, जो अर्थपूर्ण असतो. कुठलाही ध्वनी किंवा दृश्य चिन्ह म्हणजे शब्द नव्हे. शब्दाला अर्थ असतो. अनेक अर्थपूर्ण शब्द विशिष्ट

रीतीने एकत्र आले, की वाक्य तयार होते. आपल्याला ज्ञान असते, त्यातील मोठा भाग ऐकलेल्या, वाचलेल्या वाक्यांमधून मिळालेल्या ज्ञानाचा असतो, भाषेतून मिळवलेल्या ज्ञानाचा असतो.

मात्र हे लक्षात ठेवणे आवश्यक आहे, की ऐकलेल्या किंवा वाचलेल्या प्रत्येक वाक्यामधून आपल्याला प्रमेची प्राप्ती होईल असे नाही. प्रमा म्हणजे सत्य ज्ञान हे आपण पाहिलेलेच आहे.

**चला करूया!**

माध्यमांनी दिलेल्या चुकीच्या/असत्य बातम्या किंवा माहिती यांची उदाहरणे गोळा करून त्यांच्या दुष्परिणामांची चर्चा करा.

साहजिकच शब्दांमधून जर असत्य आपल्या समोर येत असेल तर त्या शब्दाला 'प्रमाण' म्हणजे प्रमेचे साधन मानता येणार नाही. यासाठीच न्याय दर्शनाने 'शब्द म्हणजे आप्तवाक्य' असे प्रतिपादन केले आहे. इथे 'आप्त' या शब्दाचा अर्थ 'नातेवाईक' असा नसून 'विश्वसनीय व्यक्ती' असा आहे. जी व्यक्ती ज्ञानी किंवा जाणकार आहे, जी विश्वास ठेवण्याच्या योग्यतेची आहे त्या व्यक्तीला 'आप्त' म्हणतात. अशी व्यक्ती अज्ञानी नसते, त्याचप्रमाणे असत्य भाषण करणारी नसते, त्यामुळेच ती व्यक्ती 'विश्वासपात्र' असते, अशा व्यक्तीच्या शब्दांमधून प्रमेची प्राप्ती होऊ शकते. माध्यमांचा विशेषकरून समाजमाध्यमांचा प्रचंड प्रभाव असणाऱ्या सध्याच्या काळात 'आप्त' या शब्दाची व्याख्या नेहमी लक्षात ठेवणे अतिशय महत्त्वाचे आहे. माध्यमांमधून आपल्यापर्यंत जे पोहोचत आहे ते विश्वसनीय आहे की नाही हे बघणे जेवढे आवश्यक आहे, तेवढेच माध्यमांचा वापर करताना आपण स्वत: विश्वसनीय जाणकार व्यक्ती आहोत का याचा विचार करणेही गरजेचे आहे. अशा विचारांमधूनच आपण माध्यमांचा उपयोग जबाबदारीने करायला शिकू.

**चला लिहूया!**

'माध्यमांची विश्वसनीयता' या विषयावर चिकित्सक निबंध लिहून वर्गात सादर करा.

नैय्यायिकांनी शब्दाची काही वर्गीकरणेही सांगितली आहेत. ज्या शब्दांमधून दृश्य वस्तूंचे ज्ञान होते, त्यांना दृष्टार्थ म्हणतात. ज्या शब्दांमधून दिसू न शकणाऱ्या गोष्टींचे ज्ञान होते, त्यांना अदृष्टार्थ असे म्हणतात. दुसऱ्या वर्गीकरणानुसार शब्दांचे वैदिक आणि लौकिक असे दोन प्रकार होतात. वेदवाङ्‌मयातील शब्द मानवाने लिहिलेले शब्द नसून ईश्वराचे असल्याने सत्य आणि दोषरहित असतात असे न्याय दर्शन मानते. लौकिक शब्द मानवाचा असतो आणि तो खरा किंवा खोटा असू शकतो, म्हणूनच सर्व शब्द प्रमाण नसतात. विश्वसनीय मानवाचा लौकिक शब्द आणि परमआप्त अर्थात परमविश्वसनीय ईश्वराचा वैदिक शब्द हेच प्रमाण असतात.

**वाक्यार्थाच्या अटी**

अर्थपूर्ण शब्दांमधून वाक्य तयार होत असले तरी वाक्य अर्थपूर्ण होण्यासाठी तेवढे पुरेसे नसते. न्याय दार्शनिक वाक्याची रचना अर्थपूर्ण करण्यासाठी चार अटींची पूर्तता व्हायला हवी असे सांगतात. त्या चार अटी अशा :

**(१) आकांक्षा :** एकाच शब्दातून सहसा संपूर्ण अर्थ व्यक्त होऊ शकत नाही. त्यासाठी त्या शब्दाचा इतर शब्दांशी संबंध जुळावा लागतो. समजा, वर्गात शिक्षक 'लिहा' एवढेच म्हणाले, तर अर्थातच तुम्ही विचाराल 'काय लिहू'? शिक्षक जेव्हा सांगतील 'शब्द आणि अर्थ यांचा संबंध काय असतो ते लिहा', तर ते पूर्ण वाक्य अर्थपूर्ण होते. सुट्या, एकट्या शब्दाला अर्थपूर्ण होण्यासाठी इतर शब्दांची जी अपेक्षा असते, तिला 'आकांक्षा' म्हणतात.

**(२) योग्यता :** वाक्य अर्थपूर्ण होण्यासाठी अनेक शब्दांची गरज असतेच, पण त्या शब्दांमध्ये योग्य संबंधही असावे लागतात. परस्परविसंगत शब्दांमधून अर्थनिष्पत्ती होऊ शकत नाही. "आग अगदी बर्फासारखी गारगार आहे" या वाक्यातून काहीच अर्थबोध होत नाही; कारण आग आणि बर्फासारखा गार स्पर्श या दोन गोष्टी योग्य पद्धतीने एकत्र आणल्या गेलेल्या नाहीत.

**(३) सन्निधी :** सन्निधी याचा अर्थ समीपता.

वेगवेगळ्या शब्दांमधून एकत्रितपणे अर्थ निर्माण होण्यासाठी शब्द, काल आणि अवकाशात एकमेकांच्या समीप म्हणजे जवळ हवेत. एकमेकांशी बोलताना आपण दोन-दोन मिनिटांच्या अंतराने शब्द उच्चारले, तर पहिल्या दोन अटी पूर्ण झाल्या असल्या, तरीही अर्थनिष्पत्ती होणार नाही. त्याचप्रमाणे लिहिताना शब्द सुटेसुटे वेगवेगळ्या ओळीत लिहिले, तर ते अर्थ निर्माण करू शकणार नाहीत.

**(४) तात्पर्य :** काही वेळा एकाच शब्दाचे एकापेक्षा जास्त अर्थ असतात. एखाद्या वाक्यात असा अनेकार्थी शब्द नक्की कुठल्या अर्थाने वापरला आहे हे ठरवण्यासाठी त्या शब्दाच्या वापरकर्त्याचा उद्देश काय होता किंवा त्याला अभिप्रेत अर्थ काय होता हे विचारात घ्यावे लागते. ज्या संदर्भात तो शब्द उपयोगात आणला गेला आहे, तो संदर्भ त्यासाठी महत्त्वाचा असतो. उदाहरणार्थ, 'मला पदाचा मोह नाही' असे विधान कोणी केले, तर 'पद' या शब्दाचा अर्थ इथे 'सामाजिक स्थान' असा घ्यायचा असतो. 'शब्द', 'गीत', 'पाय' हे त्याचे जे इतर अर्थ आहेत, त्यांपैकी कुठलाही अर्थ इथे गैरलागू आहे.

**चला शोधूया!**

Think-Pair-Share

ज्यामध्ये वाक्यार्थ्याच्या चारही अटी पूर्ण होतात अशी विधाने शोधा व त्यांची तुमच्या सहाध्यायीकडून तपासणी करून घ्या. दोघांकडून नक्की झालेली विधाने वर्गासमोर सादर करा.

आपण मागील वर्षी या गोष्टींची नोंद घेतली होती, की प्रत्येक दर्शनाने मानलेली प्रमाणांची संख्या वेगवेगळी आहे. न्याय दर्शनाने मानलेल्या चार प्रमाणांव्यतिरिक्त आणखी दोन प्रमाणे मीमांसा दर्शन मानते, त्यांचीही थोडक्यात ओळख करून घेऊ.

### अर्थापत्ती

कधीकधी आपल्याला ज्ञात असलेल्या दोन गोष्टींमध्ये विसंगती असते, आपण आपल्या एखाद्या मैत्रिणीला कधीच अभ्यास करताना बघितलेले नसते. तिला खूप कमी गुण मिळणार असे आपल्याला वाटते. प्रत्यक्षात तिला उत्तम गुण मिळतात. अभ्यास न करणे आणि उत्तम गुण मिळणे यांत वरकरणी विसंगती आहे. पण या विसंगतीचे असे स्पष्टीकरण देता येते, की ही मैत्रिण नियमितपणे रात्री अभ्यास करत असली पाहिजे. या ज्ञानानंतर मूळ विसंगती राहत नाही. या प्रकारे दोन ज्ञानांमधील विसंगती दूर करून तिसरे ज्ञान मिळते, ते अर्थापत्ती या साधनाने होय.

### अनुपलब्धि

आतापर्यंत पाहिलेली सर्व प्रमाणे अस्तित्वातील वस्तूंचे किंवा ज्ञानविषयांच्या अस्तित्वाचे ज्ञान करून देतात. अनुपलब्धि प्रमाण मात्र अभावाचे किंवा एखादी वस्तू नसण्याचे ज्ञान करून देते. एखाद्या मित्राला भेटण्यासाठी आपण महाविद्यालयाच्या उपहारगृहात जातो, पण तिथे गेल्यावर कळते की तो तिथे नाही. तो तिथे असता, तर दिसला असता, पण तो तिथे नाही किंवा त्याचे तिथे नसणे दिसू शकत नाही, तरीही ते आपल्याला कळते, त्याच्या तिथे नसण्याचे ज्ञान अनुपलब्धि प्रमाणाने होते.

**चला करूया!**

प्रमाणांबद्दल अधिक माहिती मिळवून उपमान, अर्थापत्ती आणि अनुपलब्धि यांना स्वतंत्र प्रमाणे मानावे का याबद्दल वादसभा भरवून चर्चा करा.

प्रमाणविचार हा भारतीय ज्ञानमीमांसेच्या केंद्रस्थानी आहे. प्रमेयाचे ज्ञान प्रमाणांद्वारे होते हे लक्षात घेता, विश्वात काय आहे हे निश्चित करण्यासाठीही प्रमाणविचार महत्त्वाचा आहे. ज्ञानमीमांसा आणि सत्तामीमांसा यांच्यातील आंतरसंबंध यामधून लक्षात येतो. कुठले दर्शन किती आणि कोणती प्रमाणे मान्य करते याचा आणि त्या दर्शनाची सत्तामीमांसा यांत अन्योन्यसंबंध आढळून येतो.

### पाश्चात्त्य परंपरेतील ज्ञानविचार

ज्ञानमीमांसा आणि सत्तामीमांसा यांच्यातील गुंतागुंतीचे आंतरसंबंध पाश्चात्त्य तत्त्वपरंपरेतही दिसतात. या परंपरेच्या अगदी प्रारंभीच्या काळात 'काय आहे?' हा सत्तामीमांसेतील प्रश्न मध्यवर्ती होता. पण काय आहे?

किंवा काय नाही? हे ठरवण्यासाठी ते आपल्याला कळते कसे? या प्रश्नाकडे अपरिहार्यपणे वळावेच लागते.

पाश्चात्त्य तत्त्वज्ञानाच्या विकासक्रमात ज्ञानमीमांसा तत्त्वज्ञानाच्या केंद्रस्थानी आली ती आधुनिक तत्त्वज्ञानाच्या कालखंडात पण ज्ञानसाधनांसंबंधीचा विचार सॉक्रेटिसपूर्व काळातच सुरू झाला. 'विश्व नित्य आणि शाश्वत आहे, परिवर्तन हा भ्रम आहे' असे सांगणारा पारमेनायडिस आणि 'अनित्यता हेच विश्वाचे स्वरूप आहे, नित्यता हा भ्रम आहे' असे म्हणणारा हेरॅक्लिटस या दोघांचेही एका बाबतीत एकमत होते. ते म्हणजे इंद्रियजन्य ज्ञान फसवे असते, वास्तवाचे ज्ञान बुद्धिनेच होते.

या काळात विश्वाच्या स्वरूपाबद्दल जी परस्पर विसंगत मते तत्त्वज्ञांनी मांडली, त्याचा एक परिणाम म्हणजे सोफिस्ट तत्त्वज्ञांनी मांडलेला संशयवाद. ज्ञान मिळवण्याच्या मानवी क्षमतांच्या सामर्थ्यावर सोफिस्टांचा विश्वास नव्हता. त्यामुळे वस्तुनिष्ठ ज्ञानाच्या शक्यतेबद्दलच शंका घेणाऱ्या संशयवादाचा त्यांनी पुरस्कार केला. जे वास्तवात असते, ते ज्ञानेंद्रियांच्या किंवा बुद्धिच्या मर्यादित स्वरूपामुळे माणसाला जसे आहे तसे कधीच कळू शकत नाही असा संशयवाद्यांचा युक्तिवाद असतो. आपल्या क्षमतांच्या मर्यादांच्या कक्षेतच माणसाला जगाचे ज्ञान होते, एवढेच नव्हे; तर प्रत्येक व्यक्तीला आपापल्या वैयक्तिक मर्यादांमध्येच असे ज्ञान होते असे त्यांचे मत होते. त्यामुळे 'ज्ञान व्यक्तिसापेक्ष असते' असे सांगणारा सापेक्षतावादही त्यांनी स्वीकारला. या संदर्भातले प्रोटॅगोरस या सोफिस्ट तत्त्ववेत्त्याचे 'माणूस हाच सर्व गोष्टींचे परिमाण आहे' हे वचन सुप्रसिद्ध आहे.

पाश्चात्त्य ज्ञानमीमांसेची बहुतांशी जडणघडण, संशयवाद आणि सापेक्षतावाद या दोन भूमिकांचा प्रतिवाद करण्याच्या प्रयत्नांमधूनच झाली आहे, हे लक्षात ठेवायला हवे.

**चला बोलूया!**

संशयवाद आणि सापेक्षतावाद या भूमिकांची संवादपद्धतीचा वापर करून मांडणी करा. या संवादांचे वर्गासमोर सादरीकरण करा.

प्लेटोचे ज्ञानविषयक चिंतन हे याचे एक उत्कृष्ट उदाहरण आहे. ज्ञान हे जे आहे त्याचे असायला हवे म्हणजेच सत्य असायला हवे. ज्ञान वस्तुनिष्ठ, दोषरहित, सार्वत्रिक आणि सर्वकाळी सत्य असते असे प्लेटोचे ठाम मत होते. त्याच्या या ज्ञानविषयक भूमिकेचा त्याच्या सत्तामीमांसेतील आकाराच्या जगाच्या सिध्दांताशी जवळचा संबंध आहे. ज्ञानविषय अपरिवर्तनीय आणि शाश्वत असल्याशिवाय ज्ञान सर्वदा सत्य असू शकणार नाही ही प्लेटोला असलेली जाणीव आकारांच्या जगाच्या सिद्धांतांच्या मुळाशी आहे. ज्ञान म्हणजे केवळ इंद्रियसंवेदन नव्हे, ज्ञान म्हणजे मत नव्हे, ज्ञान म्हणजे निव्वळ विश्वास नव्हे अशा भूमिका मांडत ज्ञानासंबंधी जो ऊहापोह प्लेटोने केला, त्यामधूनच पाश्चात्त्य परंपरेतील 'ज्ञान म्हणजे समर्थनीय सत्य विश्वास' ही व्याख्या रूढ झाली.

## ज्ञानसंकल्पना

कोणीही व्यक्ती आपल्याला काही ज्ञान असल्याचा दावा करते, तेव्हा तो तसाच्या तसा स्वीकारून चालत नाही. त्याची तपासणी करावी लागते. ती तपासणी ज्या निकषांच्या आधारे करायची असते ते निकष, ही व्याख्या पुरवते. ज्ञान विधानांमधून व्यक्त केले जाते. विधान म्हणजे ज्याला सत्यता मूल्य आहे असे वाक्य. जी वाक्ये एकतर सत्य किंवा असत्य असतात, त्यांना सत्यता मूल्य असते. ज्ञानाच्या वरील व्याख्येत समाविष्ट असलेले निकष हे विधानाला लावून बघितले जातात. या निकषांची पूर्ती ते विधान करत असेल, तरच त्याला ज्ञानाचा दर्जा दिला जातो. अन्यथा ती केवळ समजूत किंवा धारणा असते.

**चला शोधूया!**

सत्यता मूल्य नसणाऱ्या म्हणजे विधाने नसणाऱ्या वाक्यांची उदाहरणे शोधून त्यांचे वर्गीकरण करा. वर्गीकरणासाठी व्याकरणाच्या नियमांची मदत घ्या.

ज्ञानाचा दावा करताना 'क्ष' चे मला ज्ञान आहे, या स्वरूपात तो केला जातो. इथे 'क्ष' म्हणजे ज्ञान व्यक्त करणारे एखादे विधान. उदाहरणार्थ, 'शनी ग्रहाभोवती कडी आहेत' याचे मला ज्ञान आहे. ज्ञानासंबंधी हा दावा केव्हा योग्य मानता येईल हे आता पाहूया. ज्याचे ज्ञान आपल्याला आहे असे आपण म्हणतो, त्यावर आपला विश्वास हवा, तशी आपली पक्की समजूत किंवा धारणा हवी. 'शनीभोवती कडी आहेत हे मी जाणतो, पण माझा त्याच्यावर विश्वास नाही'

असे म्हणणे आत्मविसंगत आहे. ज्ञान वस्तुनिष्ठ असले, तरी व्यक्तीची त्यासंबंधीची धारणा हा ज्ञानाचा व्यक्तिनिष्ठ पैलू असतो असे म्हणता येईल.


एखाद्या गोष्टीवर विश्वास असणे म्हणजे त्या गोष्टीचे ज्ञान असणे नव्हे, हे तुम्हांला माहिती आहेच. 'शनी हा पृथ्वीच्या सर्वांत जवळ असणारा ग्रह आहे' असा कुणाचा विश्वास असला तरी त्याला ज्ञान म्हणता येणार नाही; कारण हे खरे नाही. ज्ञान असत्य असूच शकत नाही. त्यामुळेच 'सत्यता' हा ज्ञानाचा दुसरा निकष आहे. एखादे विधान सत्य आहे की असत्य हे कशाच्या आधारे ठरवायचे यासंबंधीचे निकष आपण पुढे बघणारच आहोत.

इथे भारतीय आणि पाश्चात्त्य परंपरेत 'ज्ञान' हा शब्द ज्याप्रकारे उपयोगात आणला जातो. त्यातील फरक लक्षात घ्या. इंग्लिश भाषेतील knowledge या शब्दाचा मराठीतील प्रतिशब्द म्हणून आपण 'ज्ञान' हा शब्द पाश्चात्त्य तत्वज्ञानाच्या चर्चेत वापरतो. भारतीय परंपरेनुसार ज्ञान सत्य किंवा असत्य असू शकते. पाश्चात्त्य परंपरेनुसार धारणा सत्य किंवा असत्य असू शकते. मात्र, ज्ञान सत्यच असते. 'असत्य ज्ञान' असा शब्दप्रयोग व्याघाती आहे. पाश्चात्त्यांची ज्ञानसंकल्पना भारतीय परंपरेतील 'प्रमा' या संकल्पनेला जवळची आहे. प्रमा ही सत्यच असावी लागते. 'असत्य प्रमा' असू शकत नाही.

ज्ञानाचा 'समर्थनीयता' हा तिसरा निकष असे सांगतो, की व्यक्तीला एखाद्या गोष्टीचे ज्ञान आहे हे मान्य करण्यासाठी त्या व्यक्तीची तशी धारणा असणे आणि ती धारणा सत्य असणे पुरेसे नाही. त्या धारणेचे समर्थनही करता यायला हवे. त्याच्या सत्यतेचा पुरावा देता यायला हवा. समजा 'शनीभोवती कडी आहेत' असा विश्वास असणाऱ्या व्यक्तीला आपण विचारले की 'हे खरे कशावरून'? आणि त्या व्यक्तीने असे उत्तर दिले, की 'कारण मी ती कडी स्वप्नात पाहिली आहेत' तर त्या व्यक्तीला ज्ञान आहे असे आपण निश्चितच म्हणणार नाही. सत्यधारणेचे योग्य प्रकारे समर्थन करता येत नसेल, तर ज्ञानाचा दावा चुकीचा ठरतो. योग्य समर्थन याचा अर्थ वस्तुनिष्ठ पद्धतीने केलेले समर्थन. 'स्वप्न पडणे' हे आपली धारणा सत्य आहे असे मानण्यामागचे कारण व्यक्तिनिष्ठ आहे. व्यक्तिनिरपेक्ष, वस्तुनिष्ठ समर्थन नाही. कुणालाही पडताळून बघता येतील असे पुरावे ज्यात दिले जातात, ते समर्थन वस्तुनिष्ठ असते.

जेव्हा आपण ज्ञानाच्या समर्थनाविषयी बोलत असतो तेव्हा केवळ वस्तुस्थिती/तथ्ये आणि विधान यांतील संबंध पाहणे पुरेसे नसते, ज्ञान विधानांमधील परस्परसंबंधाचे स्वरूप पाहणे ही आवश्यक असते. ज्ञानव्यवस्थेसाठी सत्यता आणि वैधता हे दोन्हीही गुणधर्म महत्त्वाचे असतात. ज्ञानव्यवस्थेतील एक विधान त्याच व्यवस्थेतील दुसऱ्या विधानाच्या आशयाला छेद देणारे असेल तर ज्ञान विधानांतून व्यवस्था विकसित करणे अवघड होईल. तर्कशास्त्रात म्हणूनच विचारप्रक्रियेची मांडणी युक्तिवाद या स्वरूपात केली जाते. युक्तिवादाचे आधारविधाने आणि निष्कर्ष असे दोन भाग असतात.

वस्तुनिष्ठ समर्थनाची चर्चा म्हणजे एका अर्थी प्रमाणांची म्हणजेच ज्ञानसाधनांचीच चर्चा असते. कुठल्या मार्गाने, साधनाने हे ज्ञान आपल्याला मिळाले, ते साधन योग्य आहे का हे यामध्ये विचारात घ्यावे लागते. पाश्चात्त्य परंपरेतील ज्ञानसाधनांच्या किंवा ज्ञानाच्या स्रोतांच्या चर्चेकडे वळण्यापूर्वी, सत्यतेच्या निकषांविषयीच्या तीन उपपत्तींची थोडक्यात चर्चा करूया.



**चला करूया!**

ज्ञानाचे निकष लक्षात घेऊन त्याचे उदाहरणांसह संकल्पनाचित्र गटांत तयार करा.

या संकल्पनाचित्रांचे वर्गात प्रदर्शन भरवा.

## सत्यताविषयक सिद्धांत

ज्ञानाच्या संकल्पनेच्या आपण पाहिलेल्या व्याख्येत सत्याचे स्थान मध्यवर्ती आहे हे तुमच्या लक्षात आलेच असेल. ज्ञान विधानांमधून व्यक्त केले जात असले तरीपण प्रत्येक विधानामधून ज्ञान व्यक्त होतेच असे नाही. केवळ सत्य विधानांमधूनच ज्ञान व्यक्त होऊ शकते. सत्यत्व किंवा सत्यता ही ज्ञानाची एक पूर्वअट असल्यामुळे सत्य कशाला म्हणायचे हा प्रश्न ज्ञानमीमांसेसाठी अतिशय महत्वाचा आहे. तीन वेगवेगळ्या सिद्धान्तांनी यासाठी तीन वेगळे निकष सुचवले आहेत.

### सत्यतेचा अन्वय किंवा अनुरूपता सिद्धान्त

या सिद्धान्तानुसार एखादे विधान आणि त्या विधानात वर्णिलेली वस्तुस्थिती यांमध्ये जेव्हा अन्वय किंवा अनुरूपता

असते, तेव्हा ते विधान सत्य असते. 'गंगटोक ही सिक्कीमची राजधानी आहे' हे विधान गंगटोकबद्दल जी माहिती देते, ती वस्तुस्थितीला धरून आहे. त्यामुळे हे विधान सत्य आहे. विधानांचे सत्यत्व, ते ज्या परिस्थितीचे वर्णन करतात त्या परिस्थितीशी संबंधित असते. विधानातील वर्णन वस्तुस्थितीनुरूप नसेल तर विधान असत्य ठरते. 'शुक्र हा तारा आहे' हे विधान या निकषाप्रमाणे असत्य आहे, कारण वास्तवात शुक्र हा ग्रह आहे.

दैनंदिन जीवनात कळतनकळत आपण या निकषाचा उपयोग अनेकदा करत असतो. कुणीतरी आपल्याला येऊन सांगते, की 'महाविद्यालयाला उद्या सुट्टी आहे असे सूचनापत्रक सूचनाफलकावर लागले आहे'. तुम्हांला शंका येते म्हणून तुम्ही स्वत: जाऊन पाहिल्यावर असे सूचनापत्रक दिसत नाही. खोटे सांगितले म्हणून तुम्ही मित्रावर रागावता. विज्ञानाच्या क्षेत्रातही अनुरूपता सिध्दान्ताला खूप महत्त्व आहे. विधान वस्तुस्थितीनुरूप आहे की नाही हे निश्चित करण्यासाठीच विज्ञान निरीक्षण आणि प्रयोगपद्धतीचा उपयोग करते.

**चला शोधूया!**

सत्यतेच्या अनुरूपतेच्या निकषाची दैनंदिन जीवनातील उदाहरणे शोधा.

हा निकष कुठल्या विधानाला सत्य मानायचे याबद्दलच्या सर्वसाधारण आकलनाला जवळ जाणारा आहे. तरीही या सिध्दान्तामध्ये काही त्रुटी असल्यामुळे त्याच्यावर आक्षेप घेतले जातात.

विधाने आणि वस्तुस्थिती यांच्यामधील संबंध तपासून बघणे प्रत्येक वेळी शक्य नसते. भूतकाळाविषयी किंवा भविष्यकाळाविषयी केलेली विधाने वस्तुस्थितीशी पडताळून बघता येत नाहीत, कारण ती स्थिती वर्तमानात अस्तित्वातच नसते. 'शंभर वर्षांनंतर पृथ्वीवर हिमयुग येईल', अशा विधानाचा, वर्णन केलेल्या स्थितीशी अन्वय आहे की नाही, हे आपण आज सांगूच शकणार नाही. त्याचप्रमाणे सामान्य विधाने सत्य आहेत की असत्य हे ठरवणेही शक्य होत नाही. 'सर्व मानव मर्त्य आहेत', हे विधान भूत-वर्तमान-भविष्यातील सर्वच मानवांना लागू होते. त्याची तपासणी अन्वय निकषानुसार करता येत नाही. विज्ञानातील नियम हे सामान्य विधानांच्या स्वरूपाचेच असले तरी सत्य असतात. पण या निकषानुसार त्यांचे सत्यत्व प्रस्थापित करता येणार नाही. गणित किंवा तर्कशास्त्र यांमधील विधानांना आकारिक मानले जाते. ही विधाने अनुभवाला येणाऱ्या जगाचे वर्णन करत नाहीत. ती गणिती किंवा तार्किक संबंध स्पष्ट करत असतात. साहजिकच त्यांना अन्वय सिध्दान्त लागू होत नाही.

## सत्यतेचा सुसंवाद/सुसंगती सिध्दान्त

अन्वय सिध्दान्तानुसार विधानाची सत्यता त्याचा वस्तुस्थितीशी जो संबंध आहे, त्यावर अवलंबून असते. याउलट सुसंवाद सिध्दान्त असे प्रतिपादन करतो की विधानाची सत्यता त्याचा इतर विधानांशी काय संबंध आहे यावर अवलंबून असते. अनेक सत्यविधानांच्या रचनेतून ज्ञानप्रणाली तयार होते. कुठल्याही विषयाचे ज्ञान म्हणजे त्या विषयासंबंधीच्या सत्य विधानांचा केवळ एक गट किंवा समूह नसतो. ज्ञान ही त्या विधानांची एक व्यवस्था असते. ती सर्व विधाने एकमेकांशी सुसंगतपणे जोडलेली असतात. ज्या विधानाचे सत्यता मूल्य ठरवायचे असेल ते त्याच ज्ञानक्षेत्रातल्या इतर मान्यताप्राप्त सत्यांशी सुसंगत असेल, तर सत्य ठरते. 'अ' या संख्येला शून्याने गुणले, तर त्याचे उत्तर 'अ' असे येते असे विधान केले तर ते असत्य ठरते. कारण 'कुठल्याही संख्येला शून्याने गुणले असता, उत्तर शून्यच येते' या गणितातील मान्यताप्राप्त सत्याशी ते सुसंगत नाही. कुणी आपल्याला सांगितले, की माझ्या आईचे जन्मवर्ष १९९५, माझ्या वडिलांचे जन्मवर्ष १९९३ आणि माझे जन्मवर्ष १९९० तर आपण अर्थातच निष्कर्ष काढू की शेवटचे विधान असत्य असले पाहिजे. आधीच्या दोन विधानांशी ते सुसंगत नाही कारण कुणाचाही जन्म स्वत:च्या आईवडिलांच्या जन्माआधी होऊ शकत नाही. या उदाहरणांवरून हे लक्षात येते की सुसंगती किंवा सुसंवाद हा सत्याचा महत्त्वाचा निकष आहे.

तरीही या निकषाच्या संबंधानेही काही समस्या निर्माण होतात. समजा, परस्परांशी सुसंगत अशा विधानांची प्रणाली तयार केली तरी ती संपूर्ण प्रणाली खरी कशावरून असेल? तुम्ही हॅरी पॉटरच्या गोष्टी वाचल्या आहेत? किंवा त्यावरचे चित्रपट पाहिले आहेत? अशा काल्पनिक कथा, मग त्या परीकथा असोत वा विज्ञानकथा, त्यांमध्ये अंतर्गत सुसंगती असते, तरीही त्या सत्य ठरत नाहीत. असे का होते? कारण या कथा वास्तविक नसतात वस्तुस्थितीला धरून नसतात. अनुभवाधारित विज्ञानांमधे सुसंगती महत्त्वाची असते, तशीच वस्तुस्थितीशी अनुरूपताही महत्त्वाची असते. अशा अनुरूपतेखेरीज वास्तवाचे वर्णन करणारी विधाने सत्य असूच शकत नाहीत.

**चला पाहूया!**

पूर्णतः सुसंगत परंतु असत्य अशा कल्पनारम्य कथांवर आधारित चित्रपट पहा व सत्याच्या अनुरूपता आणि सुसंगती सिद्धांतांच्या संदर्भात त्यांची चर्चा करा.

## सत्यतेचा फलप्रामाण्यवादी सिद्धांत

सत्यतेचा हा सिध्दान्त वरील दोन सिध्दान्तांपेक्षा खूप वेगळा आहे. या सिध्दान्तानुसार, ज्या विधानाच्या आधारे केलेली कृती यशस्वी किंवा फलदायी होते, इच्छित परिणाम साध्य करते, ते विधान सत्य असते. म्हणजेच विधानाची सत्यता, विधानाचा वस्तुस्थितीशी किंवा इतर विधानांशी असलेल्या संबंधांवर अवलंबून नसते. ती विधानावर आधारित कृतीच्या परिणामांवर अवलंबून असते. कृती उपयुक्त किंवा फलदायी परिणाम घडवून आणत असेल, तर मूळ विधान सत्य असते. पण विधानावर आधारित कृती अयशस्वी ठरली तर ते असत्य असते. रंगहीन द्रवपदार्थाने भरलेली बाटली पाहून 'हे पाणी आहे' असे विधान केले, तर ते खरे की खोटे हे ठरवण्याचा एक मार्ग म्हणजे तो द्रव पिऊन बघणे. त्या द्रवाने तहान भागली, तर ते पाणी आहे हे विधान खरे ठरते, अन्यथा नाही. ज्ञानाचा उपयोग प्रत्यक्ष जीवनात जगताना होत असतो. फलप्रामाण्यवाद ज्ञानाच्या या उपयुक्ततेला महत्त्व देतो. विज्ञानातील प्रयोगपद्धतीही मुख्यत: या दृष्टिकोनावर आधारित असते, की एखादे विधान सत्य असेल, तर त्यापासून निष्पन्न होणारी कृती यशस्वीपणे करता यायला हवी. तिचे अपेक्षित परिणाम मिळायला हवेत. उदाहरणार्थ, एखादे द्रावण आम्ल आहे या विधानाचे सत्यत्व ठरवण्यासाठी त्यात लिटमस कागद टाकून बघितले जाते. लिटमस कागदाचा रंग बदलणे हा अपेक्षित परिणाम मिळाला, तर विधान सत्य ठरते.

या सिध्दान्ताबाबत येणारी मुख्य समस्या म्हणजे एखाद्या समजुतीमुळे, धारणेमुळे अपेक्षित परिणाम साधणारी कृती करता येत असली, तरी कृतीची यशस्विता धारणेच्या सत्याची ग्वाही देऊ शकत नाही. गिरीभ्रमणासाठी विद्यार्थ्यांचा एखादा गट जातो, तेव्हा एखादा नवखा विद्यार्थी खूप दमून जातो. 'मी यापुढे येऊ शकत नाही, मी इथेच थांबतो' असे म्हणू लागतो, अशा वेळी त्या विद्यार्थ्याला असे सांगितले, की या ठिकाणी थांबणे धोकादायक आहे, कारण इथे वन्यप्राणी येतात तर तो विद्यार्थी तिथे न थांबता मुक्कामाच्या ठिकाणापर्यंत चालत जातो. पण या परिणामांमुळे 'इथे वन्यप्राणी येतात' हे विधान खरे ठरत नाही. त्या विद्यार्थ्याला चालण्याची प्रेरणा देण्यासाठी असत्य सांगितलेले असू शकते. अर्थात, ही युक्ती सगळ्यांच्या बाबतीत लागू पडतेच असेही नाही, त्यामुळे जेव्हा हे विधान अपेक्षित परिणाम साधेल तेव्हा सत्य आणि परिणाम साधला नाही, तर असत्य असे म्हणावे लागेल. म्हणजेच फलप्रामाण्यवाद मान्य केला तर सत्य परिस्थितीसापेक्ष ठरेल, वस्तुनिष्ठ असणार नाही.

**चला करूया!**

इच्छित परिणाम साधूनही विधानांची सत्यता सिद्ध होत नाही अशा प्रसंगांचे नाट्यरूपांतर वर्गात सादर करा.

सत्यता सिध्दान्तांच्या विवेचनातून हे स्पष्ट होते, की यातील प्रत्येक सिध्दान्त सत्याच्या एका महत्त्वाच्या पैलूवर प्रकाश टाकत असला तरी कुठलाच सिध्दान्त परिपूर्ण आणि दोषरहित नाही, त्यामुळे कुठलाही एक सिध्दान्त सत्यतेचे संपूर्ण आकलन करून देऊ शकत नाही, प्रत्यक्षात वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये ज्या ज्ञानव्यवस्था अस्तित्वात असतात, त्यांमध्ये आणि वास्तवामध्ये अन्वय असतो, त्यामधील विधाने परस्परसुसंगत असतात आणि त्यामधून सफल कृती निष्पन्नही होतात. त्यामुळे सत्यतेचा विचार करताना कुठल्यातरी एका पैलूवर भर न देता, समग्रतेने विचार करावा लागतो.

## ज्ञानाचे स्रोत

पाश्चात्त्य परंपरेतील ज्ञानसंकल्पना आणि सत्यताविषयक सिध्दान्त पाहिल्यानंतर आता या परंपरेतील ज्ञानसाधने किंवा ज्ञानाच्या स्रोतांविषयीच्या चर्चेची ओळख करून घेऊया. या आधी पाहिल्यानुसार, प्रबोधनयुगानंतर युरोपमधील तत्त्वज्ञानात ज्ञानमीमांसेची खऱ्या अर्थाने उभारणी झाली. हा काळ आधुनिक विज्ञानाच्या अचंबित करणाऱ्या वाढीचा आणि विकासाचा होता. अनुभवाला येणाऱ्या जगाच्या ज्ञानाचे नवे मापदंड विज्ञानाने प्रस्थापित केले होते. यापूर्वी तत्त्वज्ञानाच्या क्षेत्रात कुठलाच सिध्दान्त, मत किंवा दृष्टिकोन सर्वमान्य नव्हता. विज्ञानाने शोधून काढलेली सत्ये मात्र सार्वत्रिक, सार्वकालिक आणि वस्तुनिष्ठ होती. त्यांमध्ये सापेक्षतेला वाव नव्हता. या नव्या ज्ञानप्रकाराची दखल घेताना तत्त्वज्ञांनी ज्ञानप्रक्रियेचा आणि ज्ञान-साधनांचा सखोल विचार केला.

आपण मागच्या वर्षी पाहिल्याप्रमाणे, बुद्धी, इंद्रियानुभव, स्मृती, अंत:प्रज्ञा, अधिकार प्रामाण्य या सगळ्यांचा ज्ञानसाधने म्हणून विचार केला जाऊ शकतो. पाश्चात्त्य परंपरेतील आधुनिक तत्त्वज्ञानाच्या कालखंडातील ज्ञानाच्या साधनांच्या चर्चेत मात्र बुद्धि आणि इंद्रियानुभव यांनाच मध्यवर्ती स्थान मिळाले आहे. एवढेच नव्हे, तर या काळातील तत्त्वज्ञानाचे दोन प्रमुख प्रवाह बुद्धिवाद आणि अनुभववाद याच नावाने ओळखले जातात. हे दोन प्रवाह सहसा परस्परविरोधी समजले जातात. ज्ञानाचा उगम मुळात बुद्धीमधून होतो की अनुभवामधून याबद्दल त्यांच्यामध्ये मूलभूत फरक आहेत. बुद्धी आणि अनुभव यांचे ज्ञानप्रक्रियेमधले

नेमके स्थान काय आहे? त्यांच्यापैकी कोणते साधन प्राथमिक आहे? या साधनांपासून निष्पन्न होणाऱ्या ज्ञानाचे स्वरूप कसे असते? या प्रकारच्या प्रश्नांसंबंधी महत्त्वपूर्ण चर्चा या काळात झाली. या सगळ्या चर्चेला विज्ञानाच्या प्रगतीची पार्श्वभूमी जशी होती, तशीच त्या काळात लोकप्रिय असलेल्या संशयवादाचीही होती. या काळातील तत्वज्ञ संशयवादाचे निराकरण करण्याचा प्रयत्न करत होते. ज्ञानप्रक्रियेच्या विश्लेषणातून वस्तुनिष्ठ ज्ञानाची शक्यता त्यांना प्रस्थापित करायची होती. असे वस्तुनिष्ठ ज्ञान कुठल्या साधनाने मिळते याची चिकित्सा त्यासाठी महत्त्वाची होती. या संदर्भात बुद्धिवाद आणि अनुभववाद यांच्यामधील मतभेदाचा एक महत्त्वाचा मुद्दा, सर्व ज्ञान अनुभवातून निष्पन्न होते की अनुभवाशिवायही बुद्धीला ज्ञानाची प्राप्ती होते यासंबंधी होता.

ज्ञानाच्या एका वर्गीकरणाच्या साहाय्याने हा मुद्दा समजावून घेऊ. हे वर्गीकरण याच काळात प्रामुख्याने केले गेले. जे ज्ञान बुद्धीला कुठलाही अनुभव येण्यापूर्वी होते, त्याला अनुभवपूर्व ज्ञान असे म्हणतात. जे ज्ञान अनुभवावर आधारित असते, अनुभवानंतर निर्माण होते, त्या प्रकारच्या ज्ञानाला अनुभवोत्तर किंवा आनुभविक ज्ञान म्हणतात. बुद्धिवादानुसार, बुद्धी हेच ज्ञानाचे उगमस्थान आहे. ज्ञानप्राप्तीचा आरंभ बुद्धीपासून होतो. अनुभवाशिवाय किंवा अनुभव येण्याआधीच काही सत्ये जाणण्याची क्षमता बुद्धीमध्ये असते. या मतामुळे बुद्धिवादी तत्वज्ञ अनूभवपूर्व ज्ञानाची कल्पना स्वीकारतात. अनुभववादी मात्र ती कल्पना पूर्णपणे नाकारतात. कारण त्यांच्या मतानुसार दृश्य जगाचे सर्व ज्ञान अनुभवावर आधारित असते. अनुभवाशिवाय नुसती बुद्धी जगाबद्दल काहीही जाणू शकत नाही. त्यांच्या मते ज्ञान अनुभवोत्तर किंवा आनुभविक असते.

या दोन प्रवाहांची थोडी अधिक ओळख करून घेण्याआधी हे लक्षात घेऊ या, की या सर्व चर्चेत 'अनुभव' हा शब्द इंद्रियानुभवाचा निर्देश करतो. अनुभव अनेक प्रकारचे असू शकतात. पण ज्ञानस्त्रोत म्हणून ज्याची चर्चा केली जाते तो अनुभव हा ज्ञानेंद्रियांमार्फत येणारा अनुभव असतो.

**चला बोलूया!**

ज्यांना आपण अनुभव म्हणतो पण जे इंद्रियानुभव नसतात अशा अनुभवांची वर्गात चर्चा करा.

दुसरा लक्षात घेण्याजोगा मुद्दा म्हणजे, बुद्धिवाद आणि अनुभववाद यांच्यातील मतभेद ज्ञानाच्या स्रोताच्या प्राथमिकतेबद्दल आहेत. बुद्धी आणि इंद्रियानुभव या दोन्हींनाही ज्ञानप्रक्रियेत महत्त्वाचे स्थान आहे, हे दोन्ही मतप्रवाह मान्य करतात. ज्ञानाची सुरुवात बुद्धीमधून होते आणि मग अनुभवाचे कार्य सुरू होते असे बुद्धिवादी मानतात. तर अनुभववादी असे प्रतिपादन करतात, की ज्ञान अनुभवातून जन्म घेते आणि त्यानंतर बुद्धी त्यावर प्रक्रिया करते.

## बुद्धिवाद

रेने देकार्त, बेनेडिक्ट स्पिनोझा आणि लाईब्निज हे तीन तत्वज्ञ बुद्धिवादी म्हणून ओळखले जातात. गेल्या वर्षी आपण देकार्तच्या संशयपद्धतीची ओळख करून घेताना हे पाहिले आहे, की देकार्तला संशयवाद पूर्णपणे चुकीचा आहे हे सिद्ध करायचे होते. त्यासाठी ज्या सत्याबद्दल संशय घेता येणे शक्य नाही असे सत्य शोधायचा त्याने प्रयत्न केला. देकार्त स्वतः तत्वज्ञानाबरोबरच गणित आणि विज्ञानाचा अभ्यासक होता. त्याच्यावर गणिती पद्धतीचा खूप प्रभाव होता. गणितातील सत्ये ही वस्तुनिष्ठ आणि व्यक्तिनिरपेक्ष, सार्वत्रिक असतात. ही सत्ये, स्थळ, काळ, संस्कृती, व्यक्ती यांनुसार कधीच बदलत नाहीत, बुद्धिवादी गणिती ज्ञानाला आदर्श ज्ञान मानत. गणिताच्या पद्धतीचे अनुकरण केल्यास इतर क्षेत्रांतही त्याच प्रकारचे ज्ञान मिळविणे शक्य होईल असा त्यांना विश्वास होता.

गणिती सत्यांचा एक विशेष असा असतो, की ही सत्ये अनुभवातून मिळालेली नसतात, अनुभवावर आधारित नसतात. त्यांची सत्यता अनुभवाच्या आधारे सिद्ध करता येत नाही. गणिती ज्ञानाचा स्रोत बुद्धी असते आणि त्याचे समर्थनही बुद्धीद्वारेच करता येते याउलट अनुभवाच्या आधारे मिळणारे ज्ञान अनेक वेळा कालसापेक्ष, परिस्थितीसापेक्ष, व्यक्तिसापेक्ष असते. गेल्या वर्षी 'जाणण्याविषयी जाणून घेताना' या पाठात आपण त्याची बरीच उदाहरणे पाहिली आहेतच. या सापेक्षतेमुळे अनुभवजन्य ज्ञान निश्चित आणि सार्वत्रिक होऊ शकत नाही. यामुळे बुद्धिवाद्यांनी निश्चित, सार्वत्रिक आणि वस्तुनिष्ठ ज्ञानाचे साधन म्हणून बुद्धिला जास्त महत्त्व दिले. ज्ञानप्रक्रियेत बुद्धिचे कार्य नेमके काय असते याबद्दलची बुद्धिवाद्यांची भूमिका मुख्यतः देकार्तच्या विचारांच्या संदर्भात समजावून घेऊया.

सर्व माणसांच्या मनामध्ये काही प्रत्यय किंवा कल्पना या जन्मतःच असतात असे देकार्तचे प्रतिपादन होते. या कल्पनांना अंतर्निहित/उपजत कल्पना असे म्हणतात. याचा अर्थ, या कल्पना ज्ञानेंद्रियांना येणाऱ्या अनुभवापासून मिळवलेल्या नसतात. त्यामुळेच त्यांचे सत्यत्व अनुभवावर अवलंबून नसते. त्या आपल्याला निश्चित स्वरूपाचे ज्ञान

देतात. स्वतःचे अस्तित्व, ईश्वराचे अस्तित्व आणि जडद्रव्याचे अस्तित्व ही अशा प्रकारच्या कल्पनांची देकार्तने दिलेली प्रमुख उदाहरणे आहेत. संशयपद्धतीचा उपयोग करून देकार्त 'स्व'चे अस्तित्व कसे सिद्ध करतो हे आपण बघितलेच आहे. 'मी विचार करतो म्हणून मी आहे' हे सत्य आपल्याला स्पष्टपणे आणि निःसंदिग्धपणे कळते. स्पष्टता आणि विविक्तता ही सत्य विधानांची लक्षणे आहेत. 'चौरसाच्या चारी बाजू समान असतात'. या विधानामधून चौरसाची संकल्पना जशी स्पष्ट होते, त्याचप्रमाणे आयताला चौरस म्हणता येत नाही हे देखील समजते. म्हणजेच चौरस आणि आयत यांमधली विविक्तता म्हणजे भेद स्पष्टपणे कळतो.

**चला शोधूया!**

ज्यामधून मूळ संकल्पना तर समजतेच पण तिचे इतरांपासून असणारे वेगळेपणही समजते अशी दैनंदिन जीवनातील उदाहरणे शोधून लिहा. उदा. लाल रंग ही संकल्पना समजते तेव्हा लाल रंग म्हणजे गुलाबी किंवा निळा रंग नाही हे ही समजते.

अशा सत्यांची प्राप्ती करून घेण्यासाठी देकार्तने सुचवलेली पद्धत भूमितीमध्ये वापरली जाणारी आहे. भूमितीमध्ये ज्याप्रमाणे गृहितांच्या आधारे बुद्धी प्रमेये सिद्ध करते, त्याप्रमाणे इतर ज्ञानक्षेत्रातही प्रत्येक विधानाची सत्यता निःसंशयपणे आणि निश्चितपणे सिद्ध व्हायला हवी. मात्र, त्यासाठी सुरुवात गृहितांपासून न करता ज्यांचे सत्य निर्विवाद, निःसंशय आहे अशा सत्य विधानांपासून करायला हवी. अशी सत्ये स्वयंसिद्ध असतात. त्यांना बाह्य समर्थनाची गरज नसते.

**चला बोलूया!**

'मी विचार करतो, म्हणून मी आहे' यांसारखी निर्विवाद सत्य असणारी विधाने गटांमध्ये चर्चा करून शोधा व त्यांची वर्गात सर्वांबरोबर चर्चा करा.

'मी विचार करतो, म्हणून मी आहे' हे असे स्वतः सिद्ध सत्य आहे. हे आणि अशी इतर सत्ये आपल्याला अंतःप्रज्ञेने कळतात. अंतःप्रज्ञेने जाणलेली सत्ये आणि अशा सत्यांपासून नैगमनिक पद्धतीने जी विधाने सिद्ध करता येतात, तीच ज्ञानव्यवस्थेचा भाग होतात असे देकार्त मानतो. इथे 'अंतःप्रज्ञा' या शब्दात देकार्तला कुठल्याही प्रकारची गूढ किंवा आध्यात्मिक क्षमता किंवा अनुभूती सुचवायची नाही. त्याच्या दृष्टिने अंतःप्रज्ञा हे जणू बुद्धीलाच होणारे एक साक्षात दर्शन किंवा ज्ञान आहे. अशी बौद्धिक अंतःप्रज्ञा आणि निगमन/सिद्धता यांच्या आधारे ज्ञाननिर्मिती होते. इंद्रियानुभव नेहमी विशिष्ट वस्तू, गुणधर्म, संबंध, घटना यांचा असतो. पण तो जाणून घेण्यासाठी आवश्यक असलेली सामान्य आणि सार्वत्रिक तत्त्वे बुद्धीकडूनच मिळतात. मानवी मनात जन्मजात असणाऱ्या प्रत्ययांमुळे, बुद्धीचे कार्य अनुभवाच्याही आधी सुरू होते आणि त्यामुळे अनुभवपूर्व ज्ञान मिळते असे देकार्तचे मत होते.

स्पिनोझा आणि लाईब्निझ यांनी या भूमिकेला पुष्टी देऊन देकार्तच्या मतात भर घातली. तत्त्वतः सर्वच ज्ञान बुद्धिद्वारे प्राप्त होऊ शकते असे स्पिनोझाने प्रतिपादन केले. अर्थात मानवी बुद्धीच्या मर्यादा त्याला मान्य होत्या. अशा मर्यादा नसत्या, तर केवळ बुद्धीने सर्व काही जाणता आले असते असे त्याचे मत होते. लाईब्निझने असे मत मांडले की केवळ 'स्व' किंवा 'ईश्वर' यांचे प्रत्ययच जन्मजात नसतात, तर गणिती किंवा तार्किक तत्त्वेही जन्मजात किंवा अंतर्निहितच असतात. तसे नसेल, तर तार्किक विचार करणे शक्य होणार नाही असे तो मानी. सर्वच ज्ञान मानवी मनात एकप्रकारे अंतर्निहित असते असे त्याचे मत होते.

ज्ञानप्रक्रियेतील अनुभवाचे कार्य या संपूर्ण बुद्धिवादी परंपरेत एक प्रकारे दुय्यम मानले गेले आहे.

**चला विचार करूया!**

'सर्व ज्ञान मानवी मनात एकप्रकारे अंतर्निहित असते', या लाईब्निझच्या मतात तुम्हांला काही अडचण जाणवते का? याची वर्गात चर्चा करा.

## अनुभववाद

जॉन लॉक, बिशप बर्कले आणि डेव्हिड ह्यूम हे तीन तत्त्वज्ञ अनुभववादाचे प्रणेते म्हणून ओळखले जातात. अनुभववादी, अनुभवपूर्व ज्ञानाची शक्यता नाकारतात. कारण, इंद्रियानुभवाशिवाय ज्ञान उत्पन्न होऊच शकत नाही असे त्यांचे ठाम मत आहे. इंद्रियानुभवातून जी विदा किंवा

माहिती आपल्यापर्यंत पोहोचते, त्यावर बुद्धि प्रक्रिया करते आणि त्यामधून ज्ञानाची निष्पत्ती होते. अनुभव नसेल, तर बुद्धिला प्रक्रिया करण्यासाठी काहीच उपलब्ध नसते, त्यामुळेच निव्वळ बुद्धि आपल्याला जगाचे ज्ञान देऊ शकत नाही. आपल्या जाणिवेला बाह्य जगाशी जोडण्याचे कार्य ज्ञानेंद्रिये करत असतात. जाणीव अशी जोडली गेल्याखेरीज जगाचे ज्ञान होणे शक्य नाही अशी त्यांची भूमिका आहे.

देकार्तचा अंतर्निहित/उपजत कल्पनांचा सिद्धांत लॉकने पूर्णपणे नाकारला. त्याच्या मते, सर्व माणसांच्या मनात अस्तित्वात असणाऱ्या अशा कुठल्याच जन्मजात कल्पना नसतात. उदाहरणार्थ, ईश्वरकल्पना ही लहान मुलांच्या मनात मुळातच असते असे दिसत नाही. सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत ती कल्पना मुलांना शिकवली जाते. नास्तिक ईश्वराचे अस्तित्व नाकारतात. तसेच ईश्वराचे अस्तित्व मानणाऱ्यांमध्येही त्याच्या स्वरूपाबद्दल खूप मतभेद असतात.

लॉक असे मत मांडतो, की जन्मतः कुठलाही अनुभव येण्यापूर्वी मन 'टॅब्यूला रासा' म्हणजे एखाद्या कोऱ्या पाटीप्रमाणे असते. अशी पाटी, ज्यावर बुद्धिने मुळातच उमटवलेली कुठलीही अक्षरे नाहीत. अनुभवामधूनच या पाटीवर अक्षरे उमटायला सुरुवात होते. याचा अर्थ असा, की मनात असणारे सर्व प्रत्यय अनुभवातूनच निर्माण झालेले असतात. सभोवतालच्या जगाबद्दलचे प्रत्यय पाच बाह्येंद्रियांना येणाऱ्या संवेदनांमधून निर्माण होतात, तर आपल्या आंतरिक विश्वाबद्दलचे प्रत्यय मनाला होणाऱ्या जाणिवांमधून निर्माण होतात. इंद्रियसंवेदन आणि अंतर्निरीक्षण हेच ज्ञानाचे मूळ स्रोत आहेत. ज्ञानप्रक्रियेची सुरुवात होताना मन निष्क्रिय असते, ते या स्रोतांमधून फक्त प्रत्यय ग्रहण करते. प्रत्यय निर्माण झाल्यानंतर मन सक्रिय होऊन त्यावर प्रक्रिया करते. प्रत्ययांचा परस्परांशी असलेला संबंध जाणून घेते. बाह्य आणि आंतरिक संवेदने जणू ज्ञानासाठी लागणारा कच्चा माल पुरवतात. या मालावर बुद्धिने प्रक्रिया केल्यानंतर ज्ञानाची निर्मिती होते. अनुभवातून निर्माण होणाऱ्या ज्ञानाचे समर्थनही अनुभवाच्या आधारेच करावे लागते, हे लॉकचे मत आजच्या विज्ञानपद्धतीशी सुसंगतच आहे.

लॉकच्या ज्ञानमीमांसेतील आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे इंद्रियानुभवातून आपल्याला वस्तूंच्या फक्त गुणधर्मांचे, संबंधांचे आणि क्रियांचे ज्ञान होऊ शकते, पण या सगळ्यांना आधारभूत असणाऱ्या द्रव्याचे साक्षात ज्ञान आपल्याला कधीच होऊ शकत नाही, ही त्याची भूमिका. आपल्या समोरच्या पेनाच्या अनुभवाचे विश्लेषण आपण केले, तर आपल्याला लक्षात येते, की अनुभव खरे तर पेनाचा रंग, रूप, आकार, पोत इत्यादींचाच असतो. त्यापलीकडे, 'पेन' या वस्तूचा वेगळा असा अनुभव आपल्याला येत नाही. अर्थात हे सगळे गुणधर्म 'पेनाचे' आहेत असे आपण मानतो, पण या मानण्याला अनुभवाचा आधार नाही. तर्काच्या आधारे तसे मानावे लागते.

लॉक वस्तूच्या गुणधर्मांचे प्राथमिक गुणधर्म आणि गौण किंवा दुय्यम गुणधर्म असे वर्गीकरण करतो. रंग, रूप, वास, चव, स्पर्श, ध्वनी हे गुणधर्म तो दुय्यम मानतो. कारण त्यांचे अस्तित्व त्यांचा अनुभव येण्यावर अवलंबून असते. तसेच त्यांचे ज्ञान व्यक्तिपरत्वे बदलू शकते. याउलट, वस्तूचे आकारमान, घनता, वस्तुमान या प्रकारचे गुणधर्म वस्तुगत आहेत. म्हणून त्यांना तो प्राथमिक म्हणतो. या प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञान वस्तुनिष्ठरित्या होऊ शकते. कारण त्यांचे अस्तित्व व्यक्तीला त्यांचा अनुभव येण्यावर अवलंबून नसते. मात्र प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञानही दुय्यम गुणधर्मांच्या मार्फतच मिळते. याचा अर्थ असा, की जगाचे जे ज्ञान आपल्याला होते त्यापैकी साक्षात अनुभव फक्त दुय्यम गुणधर्मांचाच येतो.

**चला करूया!**

वस्तूच्या गुणधर्मांवर आधारित संकल्पनाचित्र तयार करा. यासाठी विविध वस्तूंच्या उदाहरणांचा विचार करा.

त्यामधून निर्माण झालेले प्रत्यय हेच आपल्या साक्षात ज्ञानाचे विषय असतात. या प्रत्ययांपलीकडे अस्तित्व असणाऱ्या द्रव्याचे ज्ञान मात्र आपल्याला होऊ शकत नाही; कारण ते आपल्या प्रत्यक्ष अनुभवाला कधीच येत नाही. असे असूनही लॉक द्रव्याचे अस्तित्व मान्य करतो.

अनुभववादाचा दुसरा प्रणेता बर्कले मात्र लॉकच्याही पुढे जाऊन असे मत मांडतो, की जे अनुभवाला येत नाही, त्याचे अस्तित्व मानणे हे अनुभववादाच्या ज्ञानशास्त्रीय भूमिकेशी सुसंगत नाही. बर्कले असा युक्तिवाद करतो, की प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञानही दुय्यम गुणधर्मांच्या अनुभवाद्वारे

येत असल्यामुळे, प्राथमिक गुणधर्मांचे ज्ञानही व्यक्तिनिष्ठ असते. आपल्या अनुभवातून निर्माण होणारे प्रत्यय आणि हे प्रत्यय अनुभवणारे मन यांनाच सत् मानता येते. जे अनुभवाला येत नाही, त्याचे अस्तित्व, सत्‌तत्त्व मानायला ज्ञानशास्त्रीय आधार नाही. त्यामुळे बर्कले जडद्रव्याचे अस्तित्व नाकारतो. त्याच्या मते, आपण ज्याला भौतिक वस्तू समजतो, तो फक्त आपल्या अनुभवाला येणाऱ्या प्रत्ययांचा एक संघात असतो. ज्या गुणधर्मांचा प्रत्यय आपल्याला येत असतो, त्या गुणधर्मांचा आधार असे 'जडद्रव्य' नावाचे काहीही अस्तित्वात नसते.

डेव्हिड ह्यूम या तिसऱ्या अनुभववादी तत्त्वज्ञाच्या काही विचारांचा परिचय आपण मागील काही पाठांत करून घेतलाच आहे. त्यामागची त्याची ज्ञानमीमांसाविषयक भूमिका आता समजावून घेऊया. लॉक आणि बर्कले यांच्याप्रमाणे ह्यूमदेखील सर्व प्रत्यय अनुभवांमधून निर्माण होतात असे प्रतिपादन करतो. आपल्या अनुभवाचे वर्गीकरण तो संस्कार किंवा ठसे आणि कल्पना किंवा प्रत्यय यांमध्ये करतो. इंद्रियसंवेदनांमधून आपल्या मनावर जणू वेगवेगळे ठसे उमटत असतात. या ठशांच्या आधारावर मन प्रत्यय/कल्पना तयार करते. मात्र, मन प्रत्ययांची निर्मिती करताना फक्त अनुभवाचाच उपयोग करते असे नाही. कित्येक वेळा या प्रत्ययांवर कल्पनाशक्तीचा प्रभावही असतो. कल्पनाशक्तीद्‌वारे वास्तवात अनुभवाच्या पातळीवर कधीही एकत्र न येणाऱ्या दोन किंवा अधिक प्रत्ययांचे मिश्रण करून मन नवीन कल्पना तयार करते. 'सुवर्ण पर्वत' हे याचे उत्तम उदाहरण आहे. आपण सुवर्ण आणि पर्वत यांचा अनुभव घेतलेला असतो, पण 'सुवर्ण पर्वत' आजपर्यंत कोणीच पाहिलेला नाही. मन मात्र सुवर्ण पर्वताची कल्पना करू शकते. या उदाहरणामधून ह्यूम असे स्पष्ट करतो, की ज्या ज्या कल्पना किंवा जे जे प्रत्यय आपल्या मनात असतात, त्यांच्याशी जुळणारे, त्यांनी निर्देशित होणारे असे काही बाह्य जगात अस्तित्वात असतेच असे नाही. त्यामुळे मनातील कल्पनांचे काटेकोर परीक्षण करणे ज्ञानमीमांसेसाठी अत्यावश्यक असते.

ज्ञानाचे वर्गीकरण ह्यूमने ज्ञानाच्या विषयांनुसार 'प्रत्ययांचे संबंध' आणि 'तथ्ये' या दोन प्रकारांमध्ये केले आहे. यांपैकी पहिल्या प्रकारातील कल्पना या बुद्‌धिने स्वतःच निर्माण केलेल्या असतात. त्यांचे सत्यत्व अनुभवावर अवलंबून नसते, ते बुद्‌धिने प्रमाणित केलेले असते. या प्रकारातले ज्ञान हे अनिवार्य, सार्वत्रिक, निश्चित सत्य असते. हे सत्य कुठल्याही बाह्य उपाधीवर अवलंबून नसते. ते सर्वकाळी, सर्वांना मान्य असते. गणित आणि तर्कशास्त्र ही या प्रकारच्या ज्ञानाची उदाहरणे आहेत. दुसऱ्या प्रकारचे ज्ञान हे बाह्य जगातील तथ्यांविषयीचे असते. अनुभव हा या ज्ञानाचा मूळ स्रोत असतो. स्थळ-काळ-व्यक्तिनुरूप अनुभवाचे स्वरूप बदलत असल्यामुळे या प्रकारचे ज्ञान निश्चित नसते. त्याचे सत्यत्व अनिवार्य नसते, तर फक्त संभाव्य असते. विज्ञान या प्रकारचे ज्ञान असते. वैज्ञानिक सत्ये संभाव्य असतात, अनिवार्य नव्हे.

कारणताविषयक आणि स्वविषयक कल्पना या ज्ञानाच्या 'तथ्ये' या प्रकारात मोडतात. या प्रकारातील ज्ञानाची सत्यता, समर्थनीयता, त्यात समाविष्ट असणारे सर्व प्रत्यय अनुभवजन्य आहेत ना याची खात्री करून घ्यावी लागते. ते तसे नसतील, तर त्यांना ज्ञानव्यवस्थेत स्थान देता कामा नये अशी ह्यूमची भूमिका आहे. ज्या प्रत्ययांचे मूळ आपल्याला अनुभवांनी मनात उमटवलेल्या ठशात/संस्कारात सापडत नाहीत, ते प्रत्यय ज्ञानशास्त्रीयदृष्ट्या त्याज्य आहेत, ते त्यागायलाच हवेत असे ह्यूमचे ठाम मत आहे. ह्यूमने 'कारणता' आणि 'स्व' या संकल्पनांची जी चिकित्सा केली आहे, ती या पार्श्वभूमीवर समजून घ्यायला हवी. या ज्ञानशास्त्रीय भूमिकेमुळेच ह्यूमने बर्कलेच्याही पुढे जाऊन केवळ जडद्रव्याचेच नव्हे, तर चेतनद्रव्याचे अस्तित्व आणि कार्यकारणसंबंधांची अनिवार्यता नाकारली, त्याबद्‌दल संदेह निर्माण केले. त्यामुळेच ह्यूमला संशयवादी म्हटले जाते. अर्थात ह्यूम गणिती आणि तार्किक सत्ये निश्चित स्वरूपाची असतात हे मान्य करतो. म्हणजेच तो निश्चित ज्ञानाची शक्यता पूर्णपणे नाकारत नाही, त्यामुळे त्याचा संशयवाद सौम्य मानला जातो.

## बुद्‌धिवाद आणि अनुभववाद यांच्या मर्यादा

आधुनिक तत्त्वज्ञानात, देकार्तपासून सुरू झालेला ज्ञानमीमांसेचा प्रवास ह्यूमपर्यंत एका टप्प्यापाशी येऊन पोहोचतो. संशयवादाचे कायमचे निराकरण करण्याच्या उद्‌देशाने जरी या प्रवासाची सुरुवात झाली असली, तरी ते कार्य किती कठिण आहे, हे ह्यूमच्या संशयवादी भूमिकेतून लक्षात येते. भारतीय तत्त्वज्ञानाच्या परंपरेत पाहिलेले ज्ञानमीमांसा आणि सत्तामीमांसा यांच्यातील परस्परसंबंध

आपल्याला या परंपरेतही आढळतात. बुद्धिवादाने निश्चित आणि निःसंशय सत्याची शक्यता मांडली. पण केवळ बुद्धिने प्राप्त केलेल्या ज्ञानाचा ताळमेळ बाह्य विश्वाशी कसा जुळतो हे स्पष्ट करण्यात बुद्धिवाद यशस्वी ठरत नाही. आपण आधी पाहिल्याप्रमाणे, गणिती आणि तार्किक सत्ये ही या प्रकारच्या सत्यांची उदाहरणे आहेत. पण ही सत्ये आपल्याला जगाबद्दल काहीच सांगत नाहीत. त्यामुळे बाह्य जगाचे ज्ञान अनुभवातूनच मिळवायला हवे या अनुभववादी भूमिकेला एक प्रकारचे समर्थनच मिळाले. पण अनुभववादाचा विकास पुन्हा एकदा संशयवादाकडे घेऊन जाणारा ठरला. ह्यूमने ज्ञानाची जी मूलगामी चिकित्सा केली, त्यामुळे अनुभवजन्य ज्ञान अनिवार्य सत्य असू शकत नाही, ते संभाव्यच असते यावर जणू शिक्कामोर्तब झाले. बुद्धिने प्राप्त होणारे ज्ञान निश्चित असले तरी बाह्य जगाला अनुरूप असेल याची खात्री नाही आणि अनुभवातून मिळणारे बाह्य जगाचे ज्ञान कधीच निश्चित असू शकणार नाही असा विलक्षण पेच ज्ञानमीमांसेत उभा राहिला.

या पेचाला प्रतिसाद देण्याच्या प्रयत्नामधून इमॅन्युएल कांटचे चिकित्सक तत्त्वज्ञान निर्माण झाले. कांटने बुद्धिवाद आणि अनुभववाद यांची अतिशय मूलगामी चिकित्सा करून असे दाखवून दिले, की बुद्धी आणि इंद्रियानुभव या दोन्ही ज्ञानसाधनांची योग्य प्रकारे सांगड घातल्याशिवाय ज्ञाननिर्मिती होऊ शकत नाही. ज्ञानाचा आकार किंवा आराखडा पुरविण्याचे काम बुद्धी करते, तर अनुभव त्यामध्ये आशय भरतो. आकार आणि आशय यांच्या एकत्र जडणघडणीतून ज्ञान निर्माण होते. बुद्धिच्या सहयोगाखेरीज निव्वळ इंद्रियसंवेदने ज्ञान निर्माण करू शकत नाहीत हे जेवढे खरे, तेवढेच इंद्रियसंवेदनाच्या पलीकडे जाऊन अनुभवातीत असे विश्व बुद्धिही जाणून घेऊ शकत नाही, हेही खरेच! कांटने या प्रकारे ज्ञानप्रक्रियेतील बुद्धी आणि अनुभव या स्रोतांचे परस्परावलंबित्व स्पष्ट केले. कांटचे ज्ञानप्रक्रियेचे विश्लेषण, आज मेंदू-विज्ञानात जे संशोधन सुरू आहे, त्याला जवळ जाणारे आहे.

## वैज्ञानिक दृष्टिकोन

आपण तत्त्वज्ञानाच्या ऐतिहासिक परंपरेतील ज्ञानमीमांसेचा आढावा घेतला. आपण हे बघत आलो आहोत, की ज्या काळात तत्त्वज्ञांनी आपल्याला ज्ञान कसे होते या प्रश्नाचा विचार केला तेव्हा त्यांच्या हाती आजची विज्ञानाची साधने नव्हती. आपला अनुभव प्रमाण मानून आणि व्यापक निरीक्षणातून तत्त्वज्ञांनी आपला विचार मांडला. विज्ञान कुणालाही पडताळणी करता येईल अशा वस्तुनिष्ठ सत्यतेचा शोध घेते. ही पद्धत ज्ञान कसे होते याविषयी काय सांगते?

ज्ञान कसे होते याची चिकित्सा विज्ञानाच्या पद्धतीत करताना व्यक्तीसाठी ज्ञान आणि समूहासाठी ज्ञान या दोन वेगळ्या प्रक्रिया आहेत हे लक्षात घ्यावे लागते. विज्ञानाला सामूहिक प्रयत्नांतून आणि साधने वापरून जेव्हा एखादा नियम सापडतो तेव्हा त्याचे आकलन व्यक्तीला नेमके कसे होते याच्याशी त्याचा संबंध नसतो. उदाहरणार्थ, अणुचे वर्तन साधने वापरून जसे समजते तसे व्यक्तीला केवळ इंद्रियांच्या साहाय्याने समजेल असे नाही. व्यक्तीच्या आकलनाच्या मर्यादा ओलांडण्यासाठी सामूहिक आकलन आणि साधने माणसाच्या उपयोगाला आली.

ज्ञान कसे होते या बाबतीत शरीरविज्ञान आणि मेंदू विज्ञान यांची पद्धती संवेदना कशा ग्रहण केल्या जातात, त्या अनुषंगाने शरीरांतर्गत प्रक्रिया कशा चालतात हे प्रयोग, उपकरणांच्या माध्यमातून दाखवून देणे अशी असते. सजीवांची उत्पत्ती निर्जीव जगातील घटकांपासून झालेली असल्याने जैविकविज्ञानाला भौतिकविज्ञानाचे कोंदण असते. भौतिकविज्ञानाच्या पातळीवर ज्ञान कसे होते याचे स्पष्टीकरण कसे मिळते? व्यक्तीला आपल्या पंचेद्रियांनी बाह्य परिस्थितीचे ज्ञान सूक्ष्म कणांमार्फत होते. उदा. फोटॉनमार्फत दिसते, वायुकणांमुळे ऐकू येते, सूक्ष्म वस्तुकणांमुळे वास येतो, चव कळते, स्पर्श व तापमान समजते इत्यादी. विखुरणामुळे सर्वच्या सर्व सूक्ष्मकण मूळ स्वरूपात आपल्यापर्यंत पोहोचू शकत नाहीत. वाटेत काही गायब होतात, तर काहींचे स्वरूप बदलते. त्यामुळे बाह्य परिस्थितीच्या 'यथार्थ' दर्शनाचा दावा करणे अवैज्ञानिक असते.

**चला समजून घेऊया!**

ज्ञानेंद्रियांमार्फत आपल्याला होणाऱ्या ज्ञानाची प्रक्रिया भौतिकशास्त्राच्या शिक्षकांकडून समजून घ्या.

साधने किंवा उपकरणे वापरून मोजमापे करतानाही याचे भान ठेवावे लागते. मोजमापांसाठी प्रमाणीकरण करून

त्याच्या तुलनेत अचूकता व्यक्त करावी लागते. प्रकाशाच्या वेगापेक्षा अधिक काही माहीत नसताना त्या वेगाच्या मोजणीतील अचूकतेविषयी साधनांची मर्यादा मान्य करावी लागते.

विज्ञानाच्या पद्धतीत असे दिसून येते, की 'अंतिम सत्या'च्या यथार्थ ज्ञानाबाबत विज्ञान दावा करीत नाही. एखादे विधान अथवा विचारव्यवस्था ज्ञान म्हणून स्वीकारताना विज्ञान संभाव्यतेची परिभाषा वापरते. गुरूत्वाकर्षण हा निसर्ग नियम आहे असे जेव्हा म्हटले जाते तेव्हा अशा प्रकारचे बल असावे अशी संभाव्यता अतिशय जास्त असते आणि त्या संभाव्यतेचा स्वीकार केल्यानंतरच वास्तव जगातील प्रयोग किंवा तंत्रज्ञानाचे उपयोजन शक्य होते.

## शब्दसूची

लौकिक प्रत्यक्ष – Ordinary perception
अलौकिक प्रत्यक्ष – Extraordinary perception
अनुमान – Inference
प्रमा – Knowledge
प्रमाता – Knower
प्रमेय – Known
प्रमाण – Source of knowledge
व्याप्ती – Invariable concommitance
निकष – Criterion
समर्थनीयता – Justification
सत्यता – Truth
सत्यतेचा अनुरूपता सिद्धांत – Correspondence theory of Truth
सत्यतेचा सुसंवादी सिद्धांत – Coherence theory of Truth
सत्यतेचा फलप्रामाण्यवादी सिद्धांत – Pragmatist theory of Truth
फलप्रामाण्यवाद – Pragmatism
अंतर्निहित कल्पना – Innate ideas
स्वयंसिद्ध – Self-evident
तथ्ये – Matters of fact
प्रत्ययांचे संबंध – Relations of ideas

## स्वाध्याय

**प्रश्न १ कंसातील योग्य पर्याय निवडून पुढील विधाने पूर्ण लिहा.**

(१) सत्यतेच्या कसोटीला उतरणाऱ्या ज्ञानाला भारतीय तत्त्वज्ञानात ........ म्हणतात.
(धारणा, प्रमा, स्मृती)

(२) न्याय दर्शनानुसार माणसाचा ........ हा ज्ञाता असतो.
(आत्मा, जीव, अनुभव)

(३) सापेक्षतावादानुसार ज्ञान ........ असते.
(वास्तव, व्यक्तिसापेक्ष, भ्रमात्मक)

(४) देकार्तला ........ चूक आहे हे सिद्ध करायचे होते.
(बुद्धिवाद, फलप्रामाण्यवाद, संशयवाद)

**प्रश्न २ खालील शब्दसमूहासाठी पारिभाषिक संज्ञा लिहा.**

(१) ज्याचे ज्ञान होते ते.


(२) जी ज्ञानी असून विश्वास ठेवण्याच्या पात्रतेची आहे अशी व्यक्ती.

(३) ज्ञानेंद्रिय आणि वस्तू यांच्या संपर्कातून होणारे निश्चित, दोषमुक्त आणि सत्य ज्ञान.


(४) आपण काढलेला निष्कर्ष अन्य व्यक्तीला सिद्ध करून दाखविण्यासाठी वापरलेले अनुमान.

**प्रश्न ३ संकल्पनाचित्र/तक्ता/ओघतक्ता पूर्ण करा.**

(१)




(२)




**प्रश्न ४ खालील विधानांचे उदाहरणासहित स्पष्टीकरण करा.**

(१) स्पष्टता आणि विवक्तता ही सत्य विधानाची लक्षणे आहेत.

(२) इंद्रियानुभवाशिवाय ज्ञान होऊ शकत नाही.

(३) एखाद्या गोष्टीवर विश्वास असणे म्हणजे ज्ञान असणे नव्हे.

**प्रश्न ५ पुढील विधाने सत्य की असत्य हे सकारण सांगा.**

(१) केवळ मनुष्यालाच 'प्रमाता' असे संबोधता येते.

(२) ज्या अनुमानाचा वापर इतरांसाठी युक्तिवाद म्हणून केला जातो त्याला स्वार्थानुमान असे म्हटले जाते.

(३) सत्यतेच्या अनुरूपता सिद्धांतानुसार सर्व विधाने एकमेकांशी सुसंगतपणे जोडलेली असतात.

**प्रश्न ६ फरक स्पष्ट करा.**

(१) स्वार्थानुमान - परार्थानुमान

(२) बुद्धिवाद - अनुभववाद

(३) प्राथमिक व दुय्यम गुणधर्म

**प्रश्न ७** न्याय दर्शनाच्या प्रमाण विचारातील 'अनुमान' प्रमाणाची सविस्तर चर्चा करा.

**प्रश्न ८** सत्यतेचा फलप्रामाण्यवादी सिद्धांत सांगून त्याच्या समस्या सोदाहरण स्पष्ट करा.

**प्रश्न ९ पुढील प्रसंगावर संवाद लिहा.**

काल्पनिक चित्रपटकथा वा परीकथांमध्ये असणारी अंतर्गत सुसंगतता आणि वास्तवापासून दिसणारी फारकत.

**उपक्रम**

'अध्ययन कसे होते' याविषयी पूरक माहिती मिळवा व अध्ययनासंबंधी सिद्धांताची माहिती देणाऱ्या भित्तिपत्रकांचे प्रदर्शन भरवा.